

माफसू यशोगाथा २०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

माफसू
यशोगाथा –२०२२



संरक्षक

कर्नल (डॉ.) प्रा. अशिश मो. पातुरकर

कुलगुरू

आणि कर्नल कमांडन्ट एन.सी.सी., माफसू, नागपूर

सल्लागार मंडळ

डॉ. अनिल उ. भिकाने
संचालक विस्तार शिक्षण

डॉ. शिरीष वि. उपाध्ये
संचालक (शिक्षण) तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान)

डॉ. नितीन व. कुरकुरे
संचालक संशोधन

डॉ. सुनिल के. सहातपुरे
अधिष्ठाता (निम्न शिक्षण)

डॉ. प्रशांत गो. वासनिक
अधिष्ठाता (दुग्धतंत्रज्ञान)

डॉ. सचिन वा. बोंडे
अधिष्ठाता (मत्स्यविज्ञान)

संपादकीय मंडळ

डॉ. अनिल उ. भिकाने
संचालक विस्तार शिक्षण

डॉ. गितांजली वि. ढुमे
तांत्रिक अधिकारी

डॉ. सारीपुत पां. लांडगे
सहा. प्राध्यापक व तांत्रिक अधिकारी

डॉ. शेखर र. बढे
सहा. प्राध्यापक

डॉ. अतुल प. ढोक
सहा. प्राध्यापक व तांत्रिक अधिकारी

प्रकाशक

विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर- ४४० ००१

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440001
MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY
Futala Lake Road, NAGPUR - 440 001
Ph. (O) : + 91 712 : 2511088, 712 2511282 , Email :vc@mafsu.in, Website : www.mafsu.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



कर्नल (डॉ.) प्रा. आशिश मो. पातुरकर
कुलगुरू
आणि कर्नल कमांडन्ट एन.सी.सी.,माफसू, नागपुर

Col (Dr.) Prof. A. M. Paturkar,
M.V.Sc., Ph.D. FIAVPHS, FNAVS
Vice Chancellor
& Colonel Commandant NCC, MAFSU, Nagpur

प्रस्तावना

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ हे विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून पशुपालकांचे उत्पन्न वाढविणे व त्यांचे जीवनमान उंचावणे यासाठी सतत प्रयत्नशील आहे. पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान व मत्स्य व्यवसायावर विकसीत तंत्रज्ञान पशुपालकांना अवगत होण्यासाठी व त्यांचा अवलंब करण्याची भावना वृध्दींगत होण्यासाठी विद्यापीठाचे प्राध्यापक/शास्त्रज्ञ मार्गदर्शक म्हणुन काम करीत आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना अधिक नफा मिळेल व त्यांची मेहनत सार्थक होईल, सोबतच या राज्यात जोडधंद्यासाठी अनुकूल वातावरण सुध्दा निर्माण होईल. अशा प्रयत्नांमुळेच बहुतांशी पशुपालकांनी त्यांचे हे स्वप्न साकार केले आहे व ते अनेकांना प्रेरणादायी ठरले आहे.

पारंपारिक पध्दतीला ज्यांनी तंत्रज्ञानाची जोड देऊन यश संपादन केले अशा ३९ पशुपालक/उद्योजकांची यशोगाथा या पुस्तिकेव्दारे प्रकाशित करण्यात येत आहे. या माध्यमातून सुशिक्षीत बेरोजगार युवकांना तसेच आशावादी शेतकऱ्यांना नवी दिशा व प्रेरणा मिळेल असा मला पुर्ण विश्वास आहे. प्रतिकुल परीस्थितीवर मात करून कित्येक महिला पशुपालक/उद्योजकांनी सुध्दा यश संपादन केले आहे.
सदर प्रकाशनाकरीता मी सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो व शुभेच्छा व्यक्त करतो.

(आशिश. मो. पातुरकर)

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440001
MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY,
Futala Lake Road, NAGPUR - 440 001
Ph. (O) : + 91 712 : 2980014 Website : www.mafsu.in, Email :dee@mafsu.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



डॉ.अ.उ.भिकाने, एम.व्ही.एससी.पीएच.डी.
संचालक, विस्तार शिक्षण

Dr. A. U. Bhikane, M.V.Sc., Ph.D.
Director Extension Education

संपादकीय

पशुपालनावर आधारित शेतीपुरक व्यवसाय म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी व मेंढी पालन, मत्स्य पालन, मुल्यवर्धित प्राणीजन्य पदार्थ असे व्यवसाय येतात. ग्रामीण भागात अशा प्रकारचे व्यवसाय सध्या जोमाने सुरू होतांना दिसत आहेत. यासाठी आवश्यक तांत्रिक ज्ञानाकरिता शेतकरी, बेरोजगार तरूण/तरूणी व नविन उद्योजक महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विज्ञापीठ, नागपूर अंतर्गत असणाऱ्या विविध घटक महाविद्यालयांच्या संपर्कात येतात आणि येथे सुरू होते शास्त्रीयदृष्टया परिपूर्ण अशा पशु आधारित शेतीपुरक व्यवसायांची .

माफसु अंतर्गत विविध महाविद्यालयांतील तज्ञांच्या मार्गदर्शनाव्दारे नविन व्यवसाय सुरू होऊन स्थिरावत आहेत आणि हे व्यवसाय परिसरातील शेतकऱ्यांकरिता एका आदर्श व्यवसायाचे स्वरूप सिध्द होत आहेत. या नविन उद्योजकांची व्यवसाय सुरू करण्याची धडपड, त्यांचे बेरेवाईट अनुभव, त्यातुन मिळणारे ज्ञान आणि या व्यवसायात जम बसविण्याकरिता अशा उद्यमी व्यवसायिकांची प्रेरणादायी गाथा इतरांसाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

निसर्गावर अवलंबुन असणाऱ्या शेती आणि शेतकऱ्यांकरीता पशुपालन आधारित उपक्रम हे नियमित उत्पन्नाचे साधन आणि आवश्यकतेनुसार त्वरित भांडवल तयार करण्याचे खात्रीलायक संसाधन आहेत. पशुधनाचा सांभाळ करणाऱ्या शेतकरी कुटूंबात आत्महत्यांचे प्रमाण देखील कमी आहे. हवामान बदलांमुळे निर्माण होणारी नैसर्गिक संकटे जसे की दुष्काळ, वादळे,अवकाळी पाऊस आणि पूर यांच्यासोबत लढत असतांना अल्पभुधारक शेतकऱ्यांकरिता पशुधन हे विम्याचे काम करते.

या यशोगाथेमुळे ग्रामीण स्तरावर शेतीसोबत इतर सलंग्नीत व्यवसाय सुरू करण्याचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन नविन उद्योजकांना मिळेल याची मला खात्री आहे.

(डॉ. अ.उ. भिकाने)
संचालक, विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपूर.

अनुक्रमणिका ....

अ.क्र.	उद्योजकाचे नाव	मुख्य मार्गदर्शकाचे नाव	मुख्य मार्गदर्शकाचा संपर्क क्र.	पृष्ठ क्र.
	दुध व्यवसाय			
०१	श्री. कृष्णाथ तुकाराम जाधव	डॉ. अनिल भिकाने	९४२०२१४४५३	०१
०२	श्री. पद्माकर भालचंद्र भोसले	डॉ. अनिल भिकाने	९४२०२१४४५३	०२
०३	श्री. ज्ञानेश्वर दिगांबर गुणाले	डॉ. अनिल भिकाने	९४२०२१४४५३	०३
०४	श्री. विनायक बापुराव पौळ	डॉ. अनिल भिकाने	९४२०२१४४५३	०४
०५	श्री. राजपाल दिगंबर बिराजदार	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	०५
०६	श्री. जयप्रकाश गणपतराव पाटिल	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	०६
०७	श्री. जितेश नंदकिशोर साबळे	डॉ. गोकुळ सोनवणे	८७९६४४८७०७	०७
०८	श्री. सुरेश सावजी लांडे	डॉ. सारिपुत लांडगे	७३५०६८६३८०	०८
०९	श्री. विवेक प्रभाकर बिजवे	डॉ. सुनिल वाघमारे	९९२१५११७९९	०९
	शेळीपालन			
१०	सौ. पद्मा गोपाळ गुथऱ्या	डॉ. अतुल ढोक	९८२३१७६३५२	१०
११	सौ. सकीला हिरामन पटोतकार	डॉ. अतुल ढोक	९८२३१७६३५२	११
१२	श्री. सुंदरलाल शाळीग्राम मावस्कर	डॉ. अतुल ढोक	९८२३१७६३५२	१२
१३	श्री. दिनेश रघुनाथराव लहारे	डॉ. हिराचंद पालमपल्ले	९८२०९७०८०८	१३
१४	श्री सोहेल मुजीब खतीब	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	१४
१५	श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल मंदेवाड	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	१५
१६	श्री. देविदास संग्राम भाटकुळे	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	१६
१७	श्री.माधवराव अभंगराव तांबरवाडे	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	१७
१८	श्री. प्रदिप शत्रुघ्न तामगाडगे	डॉ. वैशाली बांठीया	९८५०३५०४४५	१८
१९	श्री. जय सुधाकर राऊत	डॉ. सुनिल कोलते	९८२२४१५५३८	१९
२०	श्री. महादेव राजेन्द्र ठाकरे	डॉ. मो. बसीर सिद्दीकी	९४२२९६१३१३	२०
२१	श्री. सुरेश रामकिशनराव कनके	डॉ. मो. बसीर सिद्दीकी	९४२२९६१३१३	२१
२२	श्री. आबा नागनाथ शिंदे	डॉ. गोकुळ सोनवणे	८७९६४४८७०७	२२
२३	श्री. सुनिल रामदास वायळ	डॉ.अजित माळी	९८५००७०४८१	२३

अनुक्रमणिका ....

अ.क्र.	उद्योजकाचे नाव	मुख्य मार्गदर्शकाचे नाव	मुख्य मार्गदर्शकाचा संपर्क क्र.	पृष्ठ क्र.
	कुक्कुटपालन			
२४	श्री. इमरान खान	डॉ. सतिश मनवर	९७३०२८३२१२	२४
२५	श्री. मोहम्मद ओसामा अर्सलान खान	डॉ. सतिश मनवर	९७३०२८३२१२	२५
२६	श्री. सुधीर बजरंग जगदाळे	डॉ. रविंद्र जाधव	९४०५३५५८१६	२६
२७	श्री. अविनाश भालचंद्र कुरेकर	डॉ. नरेद्र खोडे	८६६८९४७२५०	२७
	वराह पालन			
२८	श्री. अमितकुमार एलफीफ जोसेफ	डॉ. वैशाली बांठीया	९८५०३५०४४५	२८
	मत्स्य व्यवसाय			
२९	श्री. दिवाकर रविंद्र मंडल	डॉ. प्रशांत तेलवेकर	९८९०९१९५४३	२९
३०	जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गट	डॉ. प्रशांत तेलवेकर	९८९०९१९५४३	३०
३१	श्री. ओमकार माणिकराव मसकल्ले	डॉ. अजय कुलकर्णी	९८६००७९८२६	३१
३२	श्री किरण कुमार जागेश्वर मेश्राम	श्री उमेश सुर्यवंशी	९१४६१०७०००	३२
	दुध संकलन व पशुजन्य पदार्थ निर्मिती			
३३	श्री. दिलीप रामचंद्र गायकवाड	डॉ. बापूराव कदम	८४५९८२४९४४	३३
३४	श्री शिवकुमार पुरूषोत्तम साकोळे	श्री संतोष चोपडे	९०११७९९२६६	३४
३५	श्री. संतोष व्यंकटराव पवळे	डॉ. प्रफुल्लकुमार पाटील	८३२९७३५३१४	३५
३६	श्री आदिल अफसर बेग मिर्झा	डॉ. किशोर राठोड	७२७६४०४६९३	३६
३७	श्री. अमोद अरूण जाधव	डॉ. शेखर बढे	८०००३५३४३२	३७
३८	सौ. प्रतिक्षा सुजित ठाकुर	डॉ. शेखर बढे	८०००३५३४३२	३८
३९	श्री. सदानंद गणपतराव ढगे	डॉ. रूपेश वाघमारे	९७६६९४०९५४	३९





माफसू यशोगाथा



सोनवतीचे कृष्णाथ देतात दुग्ध व्यावसायीकांना साथ

शेतकरी कुटूंबात जन्मलेले ४६ वर्षीय श्री कृष्णाथ तुकाराम जाधव हे सोनवती, जि. लातूर येथे पारंपारिक शेती व्यवसाय करतात. घरात सर्व भावडांमध्ये थोरले असल्याने १० वीत असतांना त्यांना शेती मध्ये वडीलांना मदत करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागली. अशा स्थितीत त्यांनी १० वी पर्यंत शिक्षण पुर्ण केले व सोबतच धाकट्या भावंडांना शिक्षणात व व्यवसाय उभा करण्यास मदत केली. म्हणुनच आज एक भाऊ मंडप डेकोरेशन व साउंड सिस्टिम व दुसरा भाऊ मोबाईल विक्रीचा व्यवसाय करतो .

तसे पाहता जाधव कुटुंबाकडे एक-दोन गायी व बैल नेहमीच असायचे पण पशुपालनाकडे व्यवसाय म्हणून ते पाहत नव्हते. मात्र तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय दवाखाना, बाभळगाव यांच्याद्वारे निघालेला अभ्यास दौरा तसेच उदगीर येथे पशुवैद्यक महाविद्यालयात घेतलेल्या प्रशिक्षणामुळे शास्त्रीय पध्दतीने जनावरांची काळजी कशी घ्यावी याबाबत ज्ञान मिळाले. कुटुंबाचा दुग्धव्यवसाय हा पारंपारिक व्यवसाय आहे. सुरूवातीला भांडवल उभारणीसाठी अडचणी आल्या मात्र २०१८ मध्ये रू. ५ लक्ष एवढे कर्ज घेऊन त्यावर मात केली. कुटुंबातील सर्व सदस्य गरजेनुसार गोठ्यातील कामे करतात तसेच त्यांचेकडे एक कामगार देखील आहे.

एका गायीपासून सुरुवात केलेल्या त्यांच्या गोठ्यात आज १३ संकरीत गायी, ९ कालवडी आणि दोन बैल आहेत. ५ गुंठ्यात त्यांनी मुक्त संचार गोठ्याची उभारणी केली आहे. त्यांचेकडे एक कडबा कुट्टी मशीन, दूध काढण्यासाठी मिल्किंग मशीन व शेड मध्ये उष्णतेपासुन बचावा साठी फॉगरची व्यवस्था आहे. ते दरवर्षी जवळपास १०० टन मुरघास बनवतात. तसेच कृत्रीम रेतनासाठी उच्च दर्जाचे लिंग वर्गीकृत विर्य वापरतात. मासिक दूध उत्पादन ४५०० लिटर असून त्यापासून त्यांना १,३०,००० रु. मिळतात, तसेच शेणखत विक्रीतून १०,००० रू. तर कालवडी विक्रीतून सरासरी २५,००० रु. अशा प्रकारे महिन्याचे उत्पादन अंदाजे १,६५,००० रु. मिळते. यावर एकत्रित १,००,००० रु. खर्च होतो. अशा प्रकारे त्यांना सरासरी दूध व्यवसायातून रु. ६५,००० मासिक उत्पन्न मिळते. योग्य दृष्टीकोन बाळगून तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व्यवसाय केल्यास यश प्राप्त होते. सध्या ते दुध डेअरीला देतात. परंतु लवकरच दुग्ध प्रक्रीया उद्योगाअंतर्गत सौर उर्जेवर खवा उद्योग सुरू करत आहेत .

दुग्ध व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नामुळे, पुर्वीपेक्षा राहणीमान उंचावले असून समाजात पतही वाढली आहे. त्यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे त्यांच्या गाव परिसरातील तरूण यशस्वीपणे दूध व्यवसाय करत आहेत. दुध व्यवसायातील यशाचे श्रेय ते डॉ अनिल भिकाने, लातूरचे सहाय्यक आयुक्त डॉ. राजकुमार पडीले व सहकारी यांना देतात. साधारण व्यक्तिमत्व व राहणीमान असलेल्या व्यक्तीने दूध व्यवसायाच्या जोरावर समाजात प्रतिष्ठा कमावली आहे. नुकताच त्यांना लातुर जिल्हा परिषदेचा आदर्श पशुपालक पुरस्कार प्राप्त झाला आहे. बेरोजगार तरुणांना नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा सल्ला ते देतात तसेच परिसरातील शेतकऱ्यांच्या गोठ्यावर जावून दुग्ध व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रत्यक्ष मदत करतात.

मार्गदर्शक
डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री कृष्णाथ तुकाराम जाधव
सोनवती, ता . जि. लातुर
मो. ९५६१८२७९९९



माफसू यशोगाथा



माफसूच्या शेतकरी जागरूकता अभियानातून पद्माकर झाले दुग्ध व्यवसायाबद्दल जागृत

घोनशी, तालुका जळकोट, जिल्हा लातुर येथील रहीवासी ३४ वर्षीय श्री पदमाकर भालचंद्र भोसले यांचे १२ वी पर्यंत शिक्षण झाले असुन त्यांच्या आई वडीलांचा शेती हा पारंपारिक व्यवसाय आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत पशुवैद्यक महाविद्यालयाचे डॉ. अनिल भिकाने यांच्या नेतृत्वाखालील टीमने २०१५ मध्ये घोनशी येथे आयोजित केलेल्या शेतकरी जागरूकता अभियानाच्या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन श्री. पद्माकर भोसले या तरुणाने त्यांचे मोठे बंधु श्री बाबासाहेब यांच्या मदतीने दुग्ध व्यवसायाची सुरुवात केली.

तेरा हजार रुपयाला उदगीरच्या बाजारातून एक म्हशीची गाभण पारडी विकत घेऊन चार महीने सांभाळल्यानंतर ती ४२,००० रूपयाला विकली. या नफ्याचा वापर करून मग पुन्हा ५२,००० रूपयाला दोन म्हशी विकत घेतल्या. पुन्हा चार महीने सांभाळून त्या ९५,००० रूपयास विकल्या. अशा प्रकारे त्यांनी सुरूवातीला पारड्यांचा सांभाळ करून त्यांच्या विक्रीतून भांडवल उभारणी केली. अशा प्रकारे भांडवल जमविल्यावर उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अनिल भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली दुग्ध व्यवसाय करावयास सुरूवात केली .

घरातील आई वडिलांसह सर्वजण शेती व पशूंची देखभाल करत असतात. सुरुवातीच्या काळात दुधास बाजारपेठ मिळत नव्हती. तेव्हा गावातीलच बस स्थानक येथील हॉल मध्ये ३० रु. लीटर दराने दूध विकण्यास सुरुवात केली. पण त्यांच्या असे लक्षात आले की मिळणाऱ्या पैशातून फक्त दूध उत्पादन खर्च निघत आहे. मग धाडशी निर्णय घेऊन गावातच जय शिवराय दूध संकलन केंद्र सुरू केले. त्यामुळे दुधास चांगला भाव मिळून गावात दूध व्यवसायाला चालना मिळाली. तसेच दुधास बाजारपेठ निर्माण झाल्याने अनेक तरुणांनी दूध व्यवसायास सुरुवात केली.

सध्या शेतात त्यांनी जनावरांसाठी ५० फुट X ३० फुट च्या आकाराच्या शेडची उभारणी केली आहे. आता त्यांचे ४५०० चौरस फूट आकाराच्या मुक्त संचार गोठ्यात रूपांतर केले आहे. सध्या त्यांचेकडे ११ संकरीत गायी, १ संकरीत कालवड, १० म्हशी तसेच दोन वर्षे वयोगटातील ५ म्हशीच्या वगारी व दोन बैल आहेत. गाई म्हशींचे सरासरी मासीक दुध उत्पादन ६००० लिटर असुन त्या पासुन २,७०,००० रू, शेण खताचे १५,००० रू. तर वगारीच्या विक्रीतुन १०,००० रू. असे प्रती महा ३,००,००० रू. उत्पन्न मिळते, तर खाद्य, मजुरी आदी वरचा खर्च वजा जाता, दोघा बधुंची प्रत्येकी ७५,००० हजार रूपयांची कमाई होते.

पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर येथे त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या प्रशिक्षणांमुळे दुधाळ जनावरांचे चारा व्यवस्थापन व बाजारातून चांगल्या प्रतीची जनावरे विकत घेण्याची पद्धती त्यांच्या लक्षात आली व दुग्ध व्यवसाय यशस्वीरीत्या करण्यास खूप मदत झाली. दुग्ध व्यवसाय सुरू करण्यापूर्वी त्यांना शेतकामासाठी वेळोवेळी सावकाराकडुन पैसे घ्यावे लागत. पण दुग्ध व्यवसाय सुरू केल्यापासून नियमित उत्पन्नाचे साधन निर्माण झाल्याने आर्थिक परिस्थिती सुधारली असून अनेकदा गावातील लोकांच्या आर्थिक अडचणी सोडवणे त्यांना शक्य झाले आहे. सध्या ते २० लक्ष रूपये खर्च करून शेतात उत्तम घर बांधत आहेत.

यशाचे श्रेय ते आई वडील आणि पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथील तज्ञांना देतात. सध्या जय शिवराय दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून गावातील तरुणांना दुग्ध व्यवसायाविषयी मार्गदर्शन करून त्यांना या व्यवसायाकडे वळविण्याचे काम ते करतात.

मार्गदर्शक

डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री. पद्माकर भालचंद्र भोसले
घोनशी, ता. जळकोट, जि. लातुर.



माफसू यशोगाथा



ज्ञानेश्वरनी दुग्ध व्यवसायातुन साधली भरीव आर्थिक प्रगती

बेलूर, ता. अहमदपुर, जि. लातुर येथील श्री ज्ञानेश्वर दिगांबर गुणाले, यांचे इयत्ता १२ पर्यंत शिक्षण झाले असुन त्यांनी २ दुधाळ म्हशी खरेदी करून फेब्रुवारी २०१७ मध्ये दुग्धव्यवसायाला सुरूवात केली. त्यांनी डॉ. अनिल भिकाने, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली आपला दुग्धव्यवसाय वृध्दींगत केला आहे. अंदाजे २० लिटर प्रतिदिन दुधापासून त्यांच्या व्यवसायाला सुरूवात झाली. चार वर्षामध्ये जिद्द, चिकाटी व कष्टाच्या जोरावर ३० म्हशीपर्यंत व्यवसाय वाढविला असुन सोबत २५ वासरांचे संगोपन करत आहेत. दुध व्यवसायाच्या उत्पन्नातून त्यांनी ४५फुट X ६० फुट एवढे मोठे शेड बांधले आहे. लहान वासरांसाठी मुक्त गोठा बांधला आहे. तसेच चारा गोडाऊन आणि मलमुत्र संकलन टाकी बांधली आहे. या टाकीतील पाणी शेतातील चारा पिकांना सोडले जाते. श्री गुणाले त्यांच्या शेतात नेपियर, बुलेट सुपर ही हिरव्या चाऱ्याची पिके घेत असुन, सोबत सोयाबीन भुसा, कडबा, चना भुसा इत्यादी सुका चारा वापरतात . दुग्धउत्पादन निरंतर राहण्यासाठी संतुलित खुराक दुग्धउत्पादनाच्या पटीत दिला जातो. आज त्यांचे सरासरी दुध उत्पादन २५०लिटर असुन त्यांची रू. ५२ प्रती लिटर या प्रमाणे विक्री होते. यातुन दरवर्षी त्यांची जवळपास ४७ लक्ष रू. मिळकत होते. खुराक, चारा, औषधी व मजुरी यावरील खर्च वजा जाता त्यांना १७ ते १८ लक्ष निव्वळ नफा राहतो. याशिवाय म्हशीचे मुत्र व गोठ्यातील वाया जाणाऱ्या पाण्यावर सेंद्रीय ऊस घेत असुन ऊसाचा उत्पादन खर्च कमी होण्याबरोबर एकरी उत्पादन ४ ते ५ टनांनी वाढले आहे.

दुध व्यवसायातील यशाचे श्रेय ते डॉ. अनिल भिकाने व सहकारी यांना देतात. साधारण व्यक्तिमत्व व राहणीमान असेलल्या या व्यक्तिने दुध व्यवसायाच्या जोरावर स्वत:ची जीप घेतली असुन समाजात प्रतिष्ठा कमावली आहे. बेरोजगार तरूणांना नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा दुग्ध व्यवसाय सुरू करण्याच्या सल्ला ते देतात. विशेष म्हणजे त्यांच्या मदतीने व प्रोत्साहनाने गावातील अनेक तरूण दुध व्यवसायाकडे वळले असुन छोट्याशा गावातील दुध उत्पादन १५०० लिटर पर्यंत पोहचले आहे.

मार्गदर्शक
डॉ. अनिल भिकाने व डॉ. रविंद्र जाधव
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री ज्ञानेश्वर दिगांबर गुणाले
बेलुर, ता. अहमदपूर, जि. लातुर
मो. ९०४९९५९५२२



माफसू यशोगाथा



जिल्हा परिषदेची नोकरी सोडून विनायक वळले दुध व्यवसायाकडे

अहमदपुर तालुक्यातील खंडाळी येथील शेतकरी कूटूंबातील पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले श्री विनायक बापुराव पौळ यांना ठाणे जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणुन नोकरी लागली होती. आई वडीलांच्या आग्रहास्तव व आयुष्यात काहीतरी करून दाखविण्याचे ध्येय ठेवून त्यांनी नोकरी सोडून गावी येऊन वडिलोपार्जित शेती व्यवसाय करण्याचे ठरविले. आधुनिक पध्दतीने शेती करत असतांना शेतीला जोड धंदा म्हणुन त्यांनी दुध व्यवसाय करण्याचे ठरविले.

दुध व्यवसायाची सुरूवात त्यांनी २०१३ मध्ये १,४७,००० रू. ची गुतंवणुक करून २ म्हशी विकत घेऊन केली. त्यांनी ३,५०,००० रू. खर्च करून ३५फुट X ६०फुट आकाराचा गोठा बांधला आहे. पशुपालनात आई वडील त्यांना जनावरांच्या चारा पाण्याची सोय करण्यास मदत करतात. व्यवसायात त्यांना जनावरांच्या खाद्य लसीकरणासंबधात अडचणी आल्या. त्यावेळी पुशवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञांच्या मदतीने यावर मात केली. सध्या त्यांच्याकडे २ म्हशी, ९ एच.एफ. जातीच्या गाई व ४ कालवडी आहेत. त्यांच्या कडे १ कडबाकुटटी यंत्र देखील आहे. नुकताच ७०फुट X १०० फुट आकाराचा मुक्त संचार गोठा बांधला आहे. दररोजचे साधारण गाई व म्हशींचे मिळुन ७० ते ७५ लिटर दुध निघते. सरासरी २८ रू. प्रति लिटर या दराने दररोज २००० ते २१०० रू. यातुन मिळतात अशा प्रकारे महिन्याला त्यांचे उत्पन्न ६० ते ६५ हजार होते. नोकराचे प्रती महा ६,००० रू, पशुखाद्याचे १५,००० रू. व इतर खर्च २ ते ३ हजार रू. वजा जाता महिन्याकाठी ४० ते ४२ हजार रूपये निव्वळ उत्पन्न मिळते. या शिवाय दरवर्षी शेणखत विक्रीतुन १,२५,००० रू. मिळतात व २ ते ३ लक्ष रूपयाच्या कालवडी निर्माण होतात. कठोर परिश्रम व तज्ञांचे मार्गदर्शन हे त्यांच्या यशाचे सुत्र आहे.शेतीला जोडधंदा म्हणुन दुध व्यवसाय करावा यासाठी त्यांनी गावातील २० ते २५ तरूणांना प्रोत्साहन दिले आहे.

दुध व्यवसाय सुरू करण्यापुर्वी त्यांचे राहणीमान साधारण होते. या व्यवसायामुळे लोकांत त्यांची सामाजिक व आर्थिक पत उंचावली आहे. तसेच लोक आता त्यांच्याकडे उद्योजक या भावनेने पाहतात.

यशाचे श्रेय ते त्यांचे आई वडिल, पशुवैद्यक महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल भिकाने , पशुधन विकास अधिकारी डॉ. सुर्यकांत फड व सहकारी यांच्या मार्गदर्शनाला देतात. हिरव्या चाऱ्यांचे स्वत:च्या शेतात उत्पादन घेवून व पशुखाद्यावरील खर्चात बचत करून दुध व्यवसाय यशस्वी केला जाऊ शकतो असे त्यांचे मत आहे.

मार्गदर्शक
डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री विनायक बापुराव पौळ
खंडाळी, ता. अहमदपूर, जि. लातुर
मो. ९६८९७२१७२१





माफसू यशोगाथा



दुग्ध व्यवसायातुन राजपाल बनले नव्या पिढीसाठी आदर्श

जेमतेम बारावीपर्यंतचे शिक्षण झालेले श्री राजपाल दिगंबर बिराजदार या ३४ वर्षाच्या तरूणानी कोरडवाहु शेतीतुन उत्पन्न मिळत नसल्याने शेतीला जोडधंदा म्हणुन १ मुऱ्हा म्हैस विकत घेवून २०१६ साली व्यवसाय सुरू केला. त्या म्हशीपासुन महिन्याला खर्च वजा जाता रू . ६०००/- पर्यंत उत्पन्न मिळायला लागले म्हणुन परत त्यांनी दोन-दोन म्हशी विकत घेत एकुण १० मुऱ्हा म्हशीचा गोठा केला. दुध दोहन व गोठ्यातील स्वच्छता यासाठी एक बिहारी नोकर ठेवला. १० म्हशीपासून त्यांना दररोज ८० ते ८५ लिटर दुध मिळाले. या दुधाला प्रति लिटर ४५ रू. ते ५० रू. असा भाव मिळु लागला. त्यामुळे दररोजचे ३८०० रू. त्यांना मिळत होते. सर्व खर्च वजा जाता रू १८०० ते १९०० पर्यंत उत्पन्न मिळु लागले. सुरूवातीला ते सर्व दुध हॉटेलला द्यायचे परंतु हॉटेल मालकाने आठवड्यातुन दोन वेळेस दुध नासले म्हणुन पैसे कपात केले. त्यामुळे त्यांनी अमूलचे दुध संकलन केंद्र गावात सुरू केले. सुरूवातीला सकाळ व संध्याकाळचे मिळुन १५० लिटरपर्यंत दुध संकलन होत होते. नंतर लोकांना मार्गदर्शन करत दररोजचे ७०० लिटरपर्यंत दुध संकलन होवू लागले.

सुरूवातीला व्यवसायात चारा, पाणी, पशुखाद्याच्या अडचणी आल्या, त्यामुळे त्यांनी वाळला चारा साठवण्यासाठी ५२ फुट लांब, १३ फूट रूंद व १३ फुट उंच असे पत्राचे शेड तयार केले व त्यामध्ये ६०० पोत्यांचे सोयाबीन भुसकट भरून ठेवले आणि २४ तास पाणी मिळण्यासाठी त्यांनी ५००० लिटरची टाकी ६ फुट उंचीवर बसवली. हिरव्या चाऱ्याच्या पुरवठ्याकरिता डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डी.एच.एन.-६, मका, कडवळ अशा चारापिकांची त्यांनी शेतात लागवड केली व जनावरांच्या उत्तम आरोग्यासाठी १० गुंठ्यात मुक्त संचार गोठाही सुरू केला. दुग्धव्यवसायात प्रगती करण्यासाठी डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ७ दिवसीय किफायतशीर दुग्धव्यवसायाचे प्रशिक्षण त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे पुर्ण केले. सध्या गोठ्यात एच.एफ गाई व मुऱ्हा म्हशी मिळुन जवळजवळ २७ मोठी आणि १२ लहान वासरं आहेत. या गोठ्यातुन दररोज जवळजवळ २०० लिटर दुधाचा ते पुरवठा करतात . गाईचे दुध काढण्यासाठी मिल्कींग मशिनचा वापर करतात. त्यांच्या गोठ्यामध्ये चारा कुट्टी मशिनचा वापर करून कुट्टी करून वाळला व हिरवा चारा मिश्रण जनावरांना दिले जाते. ते गोठ्यातील मलमुत्र एका खड्ड्यात संकलित करून शेतीसाठी वापरतात. त्याचबरोबर बायोगॅस निर्मिती करतात आणि जनावरांपासुन मिळणारे शेण, दावनीतील खराब चारा अर्धवट कुजवून गांडुळखत निर्मिती करण्याचे त्यांनी युनिट तयार केले असुन त्यामधुन अंदाजे वार्षिक ४० टन गांडुळखताची निर्मिती करण्याचे काम सुरू केले आहे. सध्या केवळ दुध विक्रीमधुन एक लाखापर्यंत नफा कमवत आहेत आणि भविष्यात गांडुळखत विक्रीतुन त्यांचे उत्पन्नात आणखी वाढ होणार आहे.

ते हा व्यवसाय सुरू करण्यापुर्वी कर्जबाजारी होते. लोक त्यांना म्हणायचे शेतकरी म्हटलं की कोणी मुली देत नाहीत. म्हणुन ते सुरूवातीला शेती करून विमा एजंट झाले. नंतर लग्न झाल्यानंतर एजंटशीप सोडुन दुग्धव्यवसायाकडे वळले. दुग्धव्यवसाय सुरू केला त्यावेळी अनेक लोक त्यांना नकारात्मकच बोलायचे. मात्र नंतर दुग्धव्यवसायातील प्रगती पाहून हळुहळु लोकांचा दृष्टिकोन बदलायला सुरूवात झाली. सन २०१७-२०१८ ला त्यांना लोकमत आदर्श शेतकरी पुरस्कार लातुरचे जिल्हाधिकारी श्री. श्रीकांत आणि राजेन्द्र दर्डा यांचे हस्ते मिळाला तेव्हापासून परिसरात त्यांना आदर्श शेतकरी म्हणुन लोक ओळखु लागले. नुकतेच श्री राजपाल यांना लातुरच्या जिल्हा परिषदेने आदर्श पशुपालक पुरस्कार देवून सन्मानित केले आहे. दुग्धव्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नामुळे त्यांनी त्यांच्या भावाचे एम.बी.ए. चे शिक्षण पुण्यासारख्या मोठ्या शहरात पुर्ण केले आणि दुसऱ्या भावाच्या दुकानासाठी भांडवल दिले. आता बंगला बांधुन त्यांनी स्वत:ची कार ही घेतली आहे आणि नव्या पिढीसाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

श्री. राजपाल दिगंबर बिराजदार
नेकनाळ, ता. देवणी, जि. लातुर
मो. ९९२२२०९१२६

मार्गदर्शक
डॉ. प्रफुल्लकुमार पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर





एम फिल झालेले जयप्रकाश बनले यशस्वी दुग्धव्यावसायिक

नागलगाव हे उदगीरपासुन देगलुर रोडवर ७ कि.मी. अंतरावर वसलेल गाव असुन या गावातील सेवानिवृत्त जि.प.प्रा. शाळा केंद्रप्रमुख तथा पोलिस पाटील असलेले श्री गणपतराव पाटील यांचा मोठा आणि उच्च शिक्षीत असलेला मुलगा म्हणजे श्री जयप्रकाश गणपतराव पाटील. जयप्रकाश यांचे शिक्षण एम.ए.,बी.एड.,एम फिल (भुगोल) झालेअसुन त्यांच्या कुटूंबामध्ये त्यांचे आई-वडिल, पत्नी व मुलगा, भाऊ व भावाची पत्नी व दोन्ही बहिर्णीचे लग्न झाले आहे. जयप्रकाश यांनी उच्च शिक्षण घेवुन २००५ साली नळेगाव जि. लातुर येथे शिवजागृती महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणुन ६ वर्षे काम केले. त्या नंतर त्यांनी लातुर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात ४ वर्षे कंत्राटी प्राध्यापक म्हणुन अध्यापनाचे कार्य केले . नोकरी मध्ये अपयश आल्यामुळे व शेतीची आवड असल्यामुळे नोकरी सोडून ते शेती व दुग्धव्यवसायाकडे वळले. एकदा त्यांची भेट पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर येथील डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांच्याशी झाली व त्यांच्या मार्गदर्शनातुन जयप्रकाश यांनी दुग्ध व्यवसाय करण्यास सुरूवात केली. जयप्रकाश यांनी सुरूवात एका म्हशीच्या संगोपनापासून केली आणि हळु हळु संख्या वाढवत १७ म्हशी केल्या. या म्हशींपासून दररोज ८० लिटर दुध उत्पादित होते. त्यांना सरासरी रू. ४००० प्रति दिन असे उत्पन्न मिळते . तर खर्च वजा जाता या उत्पन्नातुन रू. २००० प्रति दिन पर्यत शिल्लक राहतात व महिन्याला सर्वसाधारणपणे रू. ५०,००० ते रू. ६०,००० पर्यत नफा त्यांना मिळतो.ते उत्पादीत दुधाची विक्री गावात आणि उदगीर येथील स्टॉलवर करतात.

जनावरांच्या चारा नियोजनासाठी डी.एच.एन. ६, मका, कडवळ अशा चारा पिकांचे उत्पादन घेतात आणि वाळल्या चाऱ्या करिता ज्वारीचा कडबा आणि सोयाबीन गुळी यांचा वापर करतात. त्यांच्या प्रक्षेत्रावर चारा कुट्टी मशिन तसेच पशुखाद्य घटकांचा भरडा बनवण्यासाठी छोटी गिरणी उपलब्ध आहे. या व्यवसायामध्ये ते स्वत:, भाऊ आणि कधी-कधी शेतासाठी ठेवलेले मजुर मदत करतात . ते स्वत:चे पशुखाद्य स्वत: बनवतात व वापरतात.

भविष्यात १०० लिटर पर्यत दररोज दुध उत्पादन करून स्वत:ची छोटीशी कंपनी तयार करण्याची जयप्रकाश यांची इच्छा आहे. ते म्हणतात पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर मधुन त्यांना नियमित प्रशिक्षण मिळत गेले व वेळोवेळी नवीन तंत्रज्ञान, आरोग्य व्यवस्थापन, आहार व्यवस्थापन या विषयी त्यांना ज्ञान मिळत गेले. या व्यवसाय उभारणीमध्ये मुख्य भुमिका डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांची असल्याचेही ते आवर्जून सांगतात. आता त्यांनी स्वत:चे दुध संकलन केंद्रही सुरू केले आहे.ते त्यांच्या यशाचे श्रेय डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांच्यासोबतच त्यांचे वडील व बहिण जयमाला यांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. प्रफुल्लकुमार पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री जयप्रकाश गणपतराव पाटील
नागलगाव, ता. उदगीर, जि. लातुर
मो. ९५६१४१३६५३





उच्च शिक्षीत जितेशनी धरली दुध व्यवसायाची कास

जितेश साबळे अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी गावाचे उच्च शिक्षित तरूण. त्यांनी एम.बी.ए. फायनान्स पुणे युनिव्हर्सिटी मधुन केले होते, परंतु नोकरी करायची नाही तर शेती आणि शेतीशी पुरक अशा व्यवसायातच करियर करण्याचा संकल्प शिकत असल्यापासूनच त्यांच्या डोक्यात होता. जितेश यांची सुकेवाडी येथे तीन एकर बागायती जमीन आहे. या शिवाय वडिलांचा संगमनेर मध्ये गॅरेजचा व्यवसाय आहे. त्यामुळे त्यांनी सर्वप्रथम २०१६ मध्ये दहा हजार पक्षांचा ब्रॉयलर कोंबड्यांचा फार्म सुरू केला. त्या मध्ये जम बसल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की आपण दुध व्यवसायात उतरण्यात काही हरकत नाही कारण अहमदगनर जिल्हा आणि त्यातल्या त्यात संगमनेर तालुका हा दुग्धोत्पादनात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. त्यामुळे दुग्धव्यवसायाची सुरूवात करायची तर त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम शास्त्रोक्त दुग्ध व्यवसाय करण्यासाठी प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक समजले आणि १९ जुलै ते २१ जुलै २०१७ दरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथुन डॉ. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसीय प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केले. प्रशिक्षण घेतल्यानंतर लगेच सप्टेंबर २०१७ मध्ये लोणी प्रवरा बाजारातून तसेच दुध व्यावसायिकाकडून त्यांनी सहा एच.एफ. जातीच्या उच्च दुधाच्या गाभण गाई खरेदी केल्या .


गाईचे संगोपन करण्यासाठी त्यांनी आधुनिक तसेच परंपरागत गोठ्याचा उपयोग करण्याचे ठरवले. त्यांनी प्रशिक्षणात अवगत केलेल्या वेगेवेगळ्या गोठ्यांच्या रचना, त्याचे फायदे आणि तोटे याचा विचार करून ३० X ८० चौरस फुटाचे अर्धबंदिस्त शेड उभारले. व्यावसायिक दुधाळ जनावरांचे संगोपन करताना त्यांना सकस आहार देणे अतिशय गरजेचे असते. यासाठी जितेश साबळे यांनी प्रशिक्षणात दिलेल्या विविध चाऱ्यांच्या जातींची माहिती घेऊन प्रामुख्याने आफ्रिकन टॉल मक्याची, डीएचएन ६ तसेच लसुन घास या चारा पिकांची लागवड करून चारा खरेदी वरील अधिकचा खर्च कमी केला. उन्हाळ्यासाठी ज्वारीचा कडबा, गव्हाच्या कांड्यांचा साठा करून चारा टंचाई वर यशस्वी पणे मात केली. प्रशिक्षणात सांगितलेल्या मुरघास निर्मितीचा त्यांनी ध्यास घेऊन वर्षभर सतत मुरघास उपलब्ध राहील याची काळजी घेतली. त्यामुळे त्यांना त्याची कमतरता कधीही भासली नाही. या शिवाय मुरघास केल्याने जमीन पुन्हा चारा पिकासाठी उपयोगात आली.

जितेश यांनी आधुनिक तंत्राचा वापर करताना मिल्कींग मशिन चा वापर करून अतिरिक्त कामगारावरील खर्च कमी केला आणि दुध उत्पादन किफायतशीर झाले. त्यांना एक लिटर दुध उत्पादनासाठी २० रूपये खर्च येतो आणि दुध सरासरी २५ ते ३५ रूपये लिटर ने विक्री करतात. प्रशिक्षणात दुधाचे विपणन सांगितल्याप्रमाणे केवळ दुध संघावर अवलंबुन न राहता वैयक्तिक संबधावर जास्तीत जास्त दुध घरोघरी जाऊन विकतात. त्यामुळे सरासरी एक लिटर दुधावर बारा ते पंधरा रूपये नफा होतो. विशेषत: कोविड १९ च्या लॉकडाऊन काळात दुध संघाचे भाव कोसळले होते परंतु घरोघरी दुधाची विक्री केल्याने चांगली किंमत मिळाली. प्रशिक्षणात डॉ. गोकुळ सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने दुधाचे चक्र वर्षभर गतीमान राहीले. त्यामुळे वर्षभर सतत दुधाचा पुरवठा करणे शक्य होते. वर्षाला सर्व खर्च जाऊन निव्वळ नफा हा अडीच लाखापर्यंत मिळतो. या शिवाय घरच्या कालवडीही तयार करतात. जितेशला भविष्यात केवळ दुध उत्पादनावर न थांबता या पासून वेगवेगळे प्रक्रिया केलेले दुग्धजन्य पदार्थ बनवून या दुध व्यवसायाला अधिक मोठ्या प्रमाणात विस्तार करण्याचा मानस ते व्यक्त करतात. वेळोवेळी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महविद्यालय येथील तज्ञांनी केलेल्या बहुमुल्य मार्गदर्शनामुळे आज आपण या दुग्धव्यवसायात प्रगती करू शकलो आहोत त्या बद्दल महाविद्यालयाचे सदैव ऋणी असल्याची भावना जितेश यांनी व्यक्त केली.

श्री जितेश नंदकिशोर साबळे
संगमनेर, ता. सुकेवाडी, जि.अहमदनगर
मो.७५८८०७७५८८

मार्गदर्शक
डॉ. गोकुळ सोनवणे
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ





माफसू यशोगाथा



एकात्मीक पध्दतीतून शाश्वत समृध्दीकडे सुरेश यांची वाटचाल

श्री सुरेश सावजी लांडे, रूटस् ऑरगॅनिक फार्म, सायकी, ता. उमरेड, जि. नागपुर हे महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातून जुलै २०१८ ला कृषि अधिकारी या पदावरुन सेवानिवृत झाले. त्यांचे आई-वडील हे प्रगतशील शेतकरी होते. त्यांनी मौजा सायकी, ता. उमरेड, जि. नागपूर येथे १० एकर ओलिताखालील मध्यम ते हलकी जमीन विकत घेतली आणि सेंद्रीय पध्दतीसोबत एकात्मीक शेतीपध्दतीचे प्रक्षेत्र तयार करण्यास सुरुवात केली. स्वत:ला असणाऱ्या शेती विषयक ज्ञानासोबत अनुषंगिक विविध विषयांचे ज्ञान प्राप्त व्हावे याकरीता नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर (माफसु) येथुन दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मुल्यवर्धीत पदार्थ निर्मीती तसेच मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर (माफसु) मधून मत्स्यपालन इ. विविध विषयांचे प्रशिक्षण घेतले.

नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील विस्तार शिक्षण विभागातील डॉ. वैशाली बांठीया आणि डॉ. सारिपुत लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली साहिवाल आणि गवळाऊ गायीसाठी मुक्त संचार गोठे तयार करण्यात आले. त्यानुसार गाईचा गोठा, प्रशिक्षण गृह, चारा गोडाऊन इत्यादींचे बांधकाम पूर्ण केले. तसेच गाईच्या शेणापासून गांडूळखत प्रकल्प चालू केला. त्याचबरोबर चारा उत्पादनामध्ये सुधारित चाऱ्यांचे वाण नेपियर, डिएचएन-१०, लसुनघास आणि बरसीम चे प्रक्षेत्र तयार करण्यात आले. गोठयातील जनावरांच्या व्यवस्थापनामध्ये नियमीत जंतनिर्मुलन, लसीकरण, संतुलित खाद्य आणि योग्य प्रकारे प्रजनन व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात आले. ते कृत्रिम रेतनाव्दारे शुध्द साहिवाल आणि गवळाऊ वंशावळीच्या जनावरांची पैदास करत आहेत.

डॉ. सारिपुत लांडगे यांच्या मार्गदर्शनामध्ये देशी गाईचे ए २ दुध आणि प्रक्षेत्रावरील पशुधनाचे सेंद्रिय पध्दतीने व्यवस्थापन करण्यात येत आहे. तसेच पशुसंवर्धनावर आधारित कृषी पर्यटनाची आणि स्थानीक शेतकऱ्यांना मार्गदर्शनाकरिता सुविधा तयार करण्यात आली आहे. डॉ. किशोर राठोड, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली मुल्यवर्धीत दुग्धजन्य पदार्थांची निर्मीती करण्यात येत आहे. सेंद्रिय शेतीकरीता मा. श्री. सुभाष पाळेकर सरांचे प्रत्यक्ष भेटीतून व वाचनातून माहिती घेतली. डॉ.अमित शर्मा, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी यांनी त्यांना साहिवाल गाईची निवड आणि विकत घेण्यास करनाल, हरियाणा येथे मदत केली. ३० डिसेंबर २०१८ रोजी 'रूटस ऑरगॅनिक फार्म' चे उद्घाटन मा.ना.श्री. सुनिल केदार, मंत्री, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य आणि कर्नल प्रा. डॉ. आशिष पातुरकर, मा. कुलगुरू, मपमविवि, नागपूर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाकडून गुरांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्यात येते तसेच तांत्रिक मागदर्शन देखील मिळते. श्री. लांडे साहिवाल गाईचे दुध ए-२ या नावाने नागपूर येथे रूपये ६०/- प्रमाणे घरपोच देत आहेत. त्याद्वारे त्यांना खर्च वगळता मागील वर्षात रु. २,५०,०००/- निव्वळ नफा मिळाला. दुग्ध व्यवसायाचे श्रेय ते पत्नीला, कुटुंबीयांना तसेच नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. बांठीया मॅडम, डॉ. लांडगे, डॉ. राठोड तसेच पशुसंवर्धन खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांना देतात.

मागदर्शक
डॉ. सारिपुत लांडगे व डॉ. वैशाली बांठीया
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

श्री सुरेश सावजी लांडे
सायकी, ता. उमरेड, जि. नागपुर
मो.९४०५३३२९८९



माफसू यशोगाथा



गीर गाईचे संगोपन शास्त्रोक्त मार्गदर्शनामुळे झाले किफायतशीर

श्री विवेक प्रभाकर बिजवे हे व्यवसायीक असुन सराव, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे ५ एकर जमीन आहे. देशी गाई पालनाची आवड असल्यामुळे त्यांनी सन २०१६ मध्ये जातीवंत गीर गाई व वळू गुजरात राज्यातुन खरेदी करून व्यवसायास सुरूवात केली. गाईचे शास्त्रोक्त संगोपनाकरीता स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे तज्ञांचे मार्गदर्शन घेतले. गाई साठी संतुलित आहार, जंतनिर्मुलन, लसीकरण, आरोग्य व्यवस्थापन, प्रजनन व्यवस्थापन याबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे गोपालनातील अडचणी कमी झाल्या. त्यांनी चारा,आहार, पाणी व्यवस्थापन नियोजनबद्ध केले आहे. मुक्त संचार गोठा बांधला आहे. गोठ्यात दुधाळ, गाभण गाई, कालवडी, वासरे यांची स्वतंत्र व्यवस्था केली आहे. सद्यस्थितीत श्री बिजवे यांच्या प्रक्षेत्रावर ४८ गीर जनावरे असुन २५ मोठ्या गाई आहेत. दुधाळ १२ गाईचे दररोज सरासरी उत्पादन ६५ लिटर असुन जास्तीत जास्त १३ लिटर प्रतिदिवस उत्पादन गीर गाईने दिले आहे. दुधाची विक्री ते अकोल्यामध्ये रू. ६५ प्रति लिटर या प्रमाणे करतात. त्यातून महिन्याला सुमारे एक लाख रूपये मिळतात . वर्षाला ५ गाईची विक्री केली जाते. त्यातुन अडीच ते तीन लाख रूपये मिळतात.

देशी गाईच्या दुधाला चांगली मागणी आहे. घरपोच दुध दिले जाते. त्यासाठी ते एका होतकरू विद्यार्थ्यास प्रति लिटर १० रूपये मोबदला दिला जातो. एकुण खर्च वजा जाता ३ लक्ष नफा मिळतो. वर्षभरासाठी विविध चारा पिके लागवड त्यांनी स्वत:च्या ४ एकर प्रक्षेत्रावर केली आहे. उत्तम गीर गाईसाठी मागणी लक्षात घेता व पुढील उत्तम वंशावळी करिता लिंगवर्गीकृत रेतनाव्दारे ३ गाई गाभण असुन पुढील प्रजोत्पादनाकरीता लिंगवर्गीकृत रेतमात्रेचा वापर करणार आहेत. स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्थेतील तज्ञांचे मार्गदर्शन व भेटी यामुळे श्री. विवेक बिजवे यांचा व्यवसाय आर्थिक दृष्ट्या किफायतशीर झाला आहे व पुढे तो वाढवायचा मानस आहे.

मार्गदर्शक
डॉ. सुनिल वाघमारे व डॉ. महेश इंगवले
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला

श्री विवेक प्रभाकर बिजवे
ता. बार्शिटाकळी, जि.अकोला
मो.९०२११०५७५०



माफसू यशोगाथा



पद्मा या आदिवासी महिलेनी शेळीपालनातुन धरली शाश्वत जीवनाची कास

हिराबम्बई, तालुका धारणी, जिल्हा अमरावती (मेळघाट) महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेजवळ अतिशय दुर्गम आदिवासी गाव. याच दुर्गम गावातील आठवी पास सत्तावीस वर्षीय भिल कोरकू आदिवासी महिला सौ पद्मा गोपाळ गुथऱ्या यांनी शेळीपालनातून यशस्वी जीवनाची कास धरली आहे. सौ.पद्मा, त्यांचे पती व दोन छोटी मुले असे हे कुटूंब. घरात शेती नाही कि कुठला धंदा नाही. पती शेतमजुरी करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करायचे आणि अशा वेळी संजीवनी म्हणून चालून आले ते शेळीपालन प्रशिक्षण आणि त्यातून मिळालेल्या शेळ्या. ट्रायबल सब प्लॅन अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली च्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत, महान ट्रस्ट, उतावली धारणीच्या सहकार्याने शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षण मार्च २०१७ मध्ये आयोजित करण्यात आले होते व त्यानंतर लाभार्थ्यांची निवड करून प्रत्येकी दोन प्रौढ मादी शेळ्या व त्या गावातील युवादूत यांचेकडे एक नर देण्यात आले होते जेणेकरून शेळ्यांची पैदास योग्य रीतीने करता येईल. पद्माने या संधीच सोनं केलं. करडांची योग्य काळजी घेत त्यांना मोठे केले. सोबतच शेळ्या परत गाभण होऊन त्यांनी करडांना जन्म दिला व हि साखळी निरंतर सुरू राहिली. वेळोवेळी व योग्य सल्ल्यामुळे करडांची जोपासना व शेळ्यांचे व्यवस्थापन शक्य झाले.

शेळ्यांना नियमित खुराक सुध्दा त्यांनी द्यायला सुरू केली.पहिल्याच वर्षी बोकड विक्रीतून २१००० रूपये प्राप्त झाले व तिचा आत्मविश्वास वाढला व तिने झालेल्या पैदाशीतून करडांची संख्या वाढविणे सुरू केले. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी शेळी विक्रीतून अनुक्रमे २८००० व ३२००० रूपये मिळाले.

कोविड-१९ च्या जागतिक महामारीत सर्व जग थांबलेलं असताना लोकांच्या रोजगाराच्या संधी गेल्या असताना सुध्दा पद्मा डगमगली नाही कारण तिच्या सोबत आत्मविश्वास होता आणि शेळीपालनाची साथ होती. म्हणूनच अशा बिकट परिस्थितीत सुध्दा त्यांना नियमित आमदनी मिळत राहिली.

या उपक्रमात त्यांना पतीची उत्तम साथ मिळाली व दरम्यानच्या काळात जुजबी लाकडी सामानातून व बांबुचा वापर करून स्वतंत्र गोठ्याची निर्मिती केली. आज लहान मोठे नर मादी अशी एकूण १६ शेळ्या पद्माकडे आहेत. सोबतच त्या नर बोकड पैदाशीकरिता व विशिष्ट बार्बीसाठी तयार करीत आहेत, जेणेकरून अधिक नफा कमावता येईल. प्रकल्पाचा फायदा खुप मोठ्या प्रमाणात झाला व त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावून समाजात प्रतिष्ठा वाढली. अतिशय दुर्गम भागात सेवा दिल्याबद्दल पद्मा या प्रकल्प प्रमुख डॉ.अतुल ढोक यांचे मार्गदर्शन व महान ट्रस्टचे प्रमुख डॉ.आशिष सातव, ट्रस्टचे प्रकल्प समन्वयक श्री त्रिलोक डोईफोडे तसेच श्री उज्ज्वल बढे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व डॉ. सुनीत वानखेडे, सहाय्यक प्राध्यापक , स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांच्या सहकार्याबद्दल सदैव ऋणी आहेत.

मार्गदर्शक
डॉ. अतुल ढोक
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

सौ. पद्मा गोपाळ गुथऱ्या
हिराबम्बई, ता. धारणी, जि. अमरावती
मो.९४२३१९३९२७







शेळीपालनातून साकारले सुखमय जीवन : मेळघाटातील सकीला यांची यशोगाथा

वय वर्षे ३८, शिक्षण केवळ ८ वी पास, नवरा व्यसनाधीन व दोन मुलांची जबाबदारी, शेतमजुरी करून उदरनिर्वाह चालवणारी बेरडाबलदा, तालुका धारणी जिल्हा अमरावती (मेळघाट) येथील कोकरू आदिवासी महिला सकीला हिरामण पटोतकार. पटोतकार दाम्पत्य शेतमजुरीवर निर्भर होते. परंतु नवरा व्यसनाधीन असल्यामुळे नियमित उत्पन्नाची शाश्वती नव्हती. असे असताना सुध्दा मुले शिकली पाहिजे ही त्यांची तीव्र इच्छा. ट्रायबल सब प्लॅन अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या माध्यमातुन राबविण्यात आलेल्या प्रकल्पाअंतर्गत, प्रकल्प प्रमुख डॉ.अतुल ढोक व सहकारी महान ट्रस्ट, उतावली धारणीच्या सहकार्यातून गावोगावी सर्वेक्षण करीत असतांना सकीला यांना शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षणात आमंत्रित करण्यात आले व त्यानंतर लाभार्थ्यांची निवड करून सकीला यांना दोन प्रौढ मादी शेळ्या व बेरडाबलदा या गावातील युवादूत दिनेश कस्तुरे यांचेकडे एक नर मार्च २०१७ मध्ये देण्यात आला. जेणेकरून शेळ्यांची पैदास योग्य रितीने करता येईल. सकीला यांना अशा प्रकारची संधी जीवनात पहिल्यांदाच आली व त्यांनी त्याचे महत्व ओळखून संधीचे यशात रूपांतर करायचे ठरवले. शेळ्या दोनच्या चार व चाराच्या आठ होऊ लागल्या. प्रशिक्षणादरम्यान शिकविलेले बारकावे व तांत्रिक बाबी लक्षात ठेवून त्याचा पुरेपूर वापर शेळीपालनात सकीला करायला लागल्या. नियमित जतंनिवारण, परोपजीवींचे निर्मुलन व लसीकरण याबरोबर नियमित खुराक सूध्दा देऊ लागल्या. ज्यामुळे वजन वाढ लवकर धरून पैदाशीचे बोकड सुध्दा तयार करण्यात आले. सकीला यांचा आत्मविश्वास बळकट होता पण त्यांना होती योग्य संधीची गरज. ती प्रकल्प अंतर्गत प्रशिक्षणे व शेळी वाटप कार्यक्रमातून साकार झाली. शेळ्यांची योग्य रितीने जोपासना करून शेळ्यांनी करडांना जन्म दिल्यानंतर, करडाची योग्य काळजी घेत त्यांना मोठे केले, शेळ्या परत गाभण राहिल्या व हि साखळी निरंतर सुरू राहीली. सकीलाला शेळीपालनातून सरासरी दरवर्षाला ४० हजाराची कमाई होते. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनाला हातभार लागला. बायकोकडे बघून पतीसुध्दा मजुरीच का होईना पण नियमित कामाला लागला. त्यामुळेच सकीला मुलांना चांगले शिक्षण देऊ शकल्या. आज त्यांचा धाकटा मुलगा दहावीला तर थोरला मुलगा हा बारावीला अमरावती येथे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात शिक्षण घेतोय हे त्यांच्यासाठी व आम्हा सर्वांसाठी फार अभिमानाची बाब आहे . कारण डोंगराळ आदिवासी भाग, भाषेची अडचण व सर्व अडचणींवर मात करीत त्यांनी कौटूंबिक हित जोपासत आर्थिक जीवनमान उंचावुन समाजात प्रतिष्ठा वाढवली व विशेषत: मुलांना योग्य वळण लावून चांगले संस्कार व शिक्षण दिले. त्यांना युवादूत दिनेश कस्तुरे यांनी योग्य सहकार्य केले. आजच्या तारखेला सकीला यांचेकडे चार गाभण शेळ्या, दोन करडे व दोन पैदाशीचे नर आहेत.

कोविड-१९ च्या जागतिक महामारीत सर्व जग थांबलेलं असताना रोजगाराच्या संधी लोकांच्या गेलेल्या असताना सकीला यांना शेळीपालनाने तारले व अशा प्रतिकुल परिस्थितीत सुध्दा त्यांचा व कुटूंबाचा उदरनिर्वाह सुरू राहिला तो केवळ शेळीपालनामुळे. म्हणूनच सकीला प्रकल्प प्रमुख डॉ. अतुल ढोक यांचे मार्गदर्शन व महान ट्रस्टचे प्रमुख डॉ.आशिष सातव, ट्रस्टचे प्रकल्प समन्वयक श्री त्रिलोक डोईफोडे तसेच श्री उज्जल बढे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डॉ. सुनीत वानखेडे, सहाय्यक प्राध्यापक, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था ,अकोला यांच्या सहकार्याबद्दल सदैव ऋणी आहे.

मार्गदर्शक
डॉ. अतुल ढोक
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.

सौ. सकीला हिरामन पटोतकार
बेरडाबलदा, ता. धारणी, जि. अमरावती
मो.९३५९३०१८९२



माफसू यशोगाथा



शेळीपालनाच्या जोडधंद्याने सुंदरलाल यांचे जीवन जगणे झाले सुंदर

श्री सुंदरलाल शाळीग्राम मावस्कर एक कोरकू आदिवासी, वय वर्षे ४४, शिक्षण १० वी पास राहणार मानसुधावडी, ता.धारणी, जिल्हा अमरावती (मेळघाट). कुटूंबात पत्नी व चार मुले आणि उदरनिर्वाह केवळ वडिलोपार्जित असलेल्या सव्वा एकर शेतीवर. त्यांनी नोकरी चा कधी प्रयत्न केला नाही आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे वडील गेल्यावर सुंदरलालला जीवन खडतर होते. परंतु ट्रॉयबल सब प्लॅन, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरूस्कृत प्रकल्पाअंतर्गत मार्च २०१७ मध्ये सुंदरलाल यांना शेळीपालन प्रशिक्षणाची संधी मिळाली. त्यांचा शेळीपालनाकडे कल असल्यामुळे लाभार्थ्यामध्ये त्यांची निवड करण्यात आली व सुंदरलाल यांना शास्त्रोक्त शेळी पालनाची संधी मिळाली. त्यांना दोन मादी शेळ्या व गावातील युवादूत यांचे कडे एक नर बोकड पैदाशीकरिता देण्यात आला. सुंदरलाल हे मेहनती व प्रामाणिक असल्यामुळे त्यांना हि संधी संजीवनी म्हणून मिळाली व त्यांनी मोठ्या शिताफीने शेळ्यांची जोपासना सुरू केली .

लवकरच गाभण शेळ्या व्याल्यानंतर करडे जन्मास आली. प्रशिक्षणादरम्यान विषद केल्याप्रमाणे करडांची योग्य निगा त्यांनी घेतली. सोबतच घरी शेती असल्यामुळे शेतीजन्य टाकाऊ पदार्थ, कुटार, खुराक इत्यादी त्यांना सहज उपलब्ध झाले. शेळ्यांची प्रजनन साखळी नियमित सुरू होती व संख्या वाढत असताना शेळ्यांची विक्रीही सुरू झाली. सुंदरलाल यांनी घराच्या अंगणातच जुजबी छत करून शेळ्यांचा निवारा केला. या जोडधंद्यात पत्नी व मोठ्या मुलांनी हातभार लावला. आज सुंदरलाल यांच्या कडे चार गाभण शेळ्या, दोन करडे व दोन नर आहेत. सुंदरलाल यांना शेतीशिवाय शेळीपालनातून वर्षा काठी अतिरिक्त सरासरी ३० हजार रूपये मिळायला लागले व त्यांचा आत्मविश्वास बळकट झाला.हा जोडधंदा त्यांच्यासाठी शाश्वत जीवनाचा आधार ठरला. प्रकल्प प्रमुख डॉ. अतुल ढोक यांचा कायम पाठपुरावा, तांत्रिक मार्गदर्शन व महान ट्रस्ट चे अमुल्य सहकार्य यामुळेच सुंदरलाल यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली.

हि यशोगाथा साकारताना महान ट्रस्ट, उतावली धारणीचे प्रमुख डॉ. आशिष सातव, ट्रस्टचे प्रकल्प समन्वयक श्री त्रिलोक डोईफोडे, श्री उज्ज्वल बढे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डॉ. सुनीत वानखेडे, सहाय्यक प्राध्यापक, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांचे सहकार्य लाभले.

मार्गदर्शक
डॉ. अतुल ढोक
नागपूर पशुवैद्यकीय महविद्यालय, नागपूर

श्री सुंदरलाल शाळीग्राम मावस्कर
मानसुधावडी, ता. धारणी, जि. अमरावती
मो.९४२२६९६१९४







दिनेशने साधले शेळीपालन व्यवसायातुन आर्थिक स्थैर्य

श्री दिनेश लहारे,अनुसूचित जमातीचे रा.गडदे, ता. विक्रमगढ, जि.पालघर येथील रहिवासी आहेत. श्री लहारे यांचा पारंपारिक व्यवसाय हा पावसाळ्यातील शेती म्हणजेच देशी तांदळाचे उत्पादन घेत असून घरात त्यांची बायको, दोन लहान मुले व आई राहतात. त्यांचे वार्षिक उत्पन्न जेमतेम रूपये २५,००० पेक्षा कमी होते. नोकरी किंवा इतर व्यवसायासाठी प्रयत्न केले नाही कारण त्यांना शहरात राहणे आवडत नाही. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. त्यांना चरितार्थ चालवणे फार अवघड झाले होते. ते फार दु:खी असत कारण त्यांना वर्षभर काही रोजगार नव्हता. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय येथील पशुधन प्रक्षेत्र संकुल आणि पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग यांनी संयुक्तपणे आयोजित केलेले प्रशिक्षण व प्रात्यक्षिक यशस्वीरित्या २०१६ साली पुर्ण केले. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने योजना प्रमुख डॉ. हिराचंद पालमपल्ले, उपसंचालक संशोधन, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय मुंबई, त्यांचे सहकारी डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. अर्जुन कोडापे व डॉ. अरूण मेंढे यांचेकडून लहारे कुटूंबियांनाभारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अनुसूचित जमाती योजनेअंतर्गत १० मादी शेळ्या व एक नर बोकडाचे वाटप करण्यात आले होते. तज्ञांनी वेळोवेळी लहारे कुटुंबीयांना शेळीपालनाचे आधुनिक व्यवस्थापन तसेच लसीकरण व जंतनाशन करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन व मदत केली.

श्री लहारे यांनी दोन वर्षामध्ये आपल्या शेळ्याकडून तीन वेते घेतली. त्यांच्याकडे ४१ शेळ्या आहेत. शेळ्यांसोबत लेंडीखत म्हणुन जवळील शेतकऱ्यांना विकतात. दर महिन्याला १ ट्रॉली लेंडी खत विकुन ५००० रूपये कमवतात व राहिलेले खत ते आपल्या शेतीत वापरतात. लेंडी खतामुळे तांदळाच्या उत्पादनात देखील लक्षणीय वाढ झाली असे ते सांगतात. गत वर्षी तांदळाच्या उत्पादनातुन त्यांनी २५,००० रूपये तर शेळीपालन या व्यवसायात ७५,००० रूपये कमविले, शेळीपालनामुळे त्यांना आर्थिक सुबत्ता आली आहे असे ते आत्मविश्वासाने आनंदी होऊन सांगतात. भविष्यात त्यांना १००० शेळ्यांचा मोठ्या प्रमाणात व्यवसाय करायचा मानस आहे. शेळीपालन हा एक उत्कृष्ठ नफा मिळवणारा उद्योग आहे व तो सुरू करण्यासाठी इतर जवळील शेतकऱ्यांना ते प्रोत्साहित करत आहेत.

श्री लहारे यांची दोन मुलं इंग्रजी शाळेत शिकत आहेत, त्यांचे शाळा शुल्क तसेच त्यांच्या विधवा आईच्या आजारपणाचा खर्च देखील शेळीपालन व्यवसाय करूनच पुर्ण करत आहेत. सौ. लहारे यांनी आपल्या भावाला देखील शेळीपालन हा स्वयंरोजगार करण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. आपल्या भावाला सौ. लहारे यांनी ११ मादी शेळ्या व २ नर बोकड शेळीपालन सुरू करण्यासाठी दिले आहेत. यशाचे श्रेय ते आपल्या मेहनतीस व मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय येथील तज्ज्ञ यांना देतात. श्री लहारे यांचा तरूण बेरोजगार युवकांना संदेश आहे की, दुसऱ्याकडे नोकरी करण्यापेक्षा शेळीपालन व्यवसाय शास्त्रीय प्रध्दतीने केल्यास हमखास नफा मिळतो.

मार्गदर्शक
डॉ. हिराचंद पालमपल्ले व डॉ. सुरेश जगदाळे
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यायल, मुंबई

श्री दिनेश रघुनाथराव लहारे
गडदे, ता. विक्रमगड, जि. पालघर
मो.८४५९११२२१३





माफसू **यशोगाथा**



अडचणीवर मात करून सोहेलनी उभारला शेळी पालन व्यवसाय

श्री सोहेल मुजीब खतीब या युवकाचा शेळीपालन व्यवसाय उद्गीर नजिकच बिदर रोडवर सुरू आहे. वडील गुत्तेदार आणि घरात आई, एक भाऊ, भावाची पत्नी, सोहेलची पत्नी असा त्याचा एकत्रित परिवार. बी.कॉम पर्यत शिक्षण होवूनही मनासारखी नोकरी मिळणे त्यांना अशक्य वाटले. लहानपासूनच घरी शेती व जनावरे असल्या कारणाने त्यांना त्यामध्ये विशेष आवड निर्माण झाली आणि आपल्या आवडीलाच त्यांनी पुढे व्यवसाय बनविला. व्यवसाय प्रत्यक्षात सुरू करण्यापुर्वी त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर येथे शेळी पालन व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले. त्यामुळे त्यांना शेळ्या कोणत्या व कोठुन घ्यावयाच्या, गोठा उभारणी कशी करावी, शेळ्यांतील लसीकरण, त्यांचे दैनंदिन व्यवस्थापन, चारा पिके लागवड व व्यवस्थापन अशा बाबी ज्ञात झाल्या. किसान गोट फार्म नावाने त्यांनी दि. ८/०५/२०१६ रोजी हा व्यवसाय सुरू केला. सुरूवातीला ३ महिने आधी चारा लागवड त्यांनी केली. चारा लागवडीनंतर शेडचे काम कमीत कमी भांडवलामध्ये डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार पुर्ण केले. शेड उभारणीसाठी जवळजवळ १,००,००० रू. त्यांनी खर्च केला. कोणतीही शासकीय योजना किंवा बँक कर्ज न घेता स्वत: च्या बळावर त्यांनी व्यवसाय उभारला. शेळीपालन व्यवस्थापन , लसीकरण या सर्व बाबी ते स्वत: व त्यांचा भाऊ पाहत असतो.

त्यांनी व्यवसाय सुरू केल्यानंतर सुरूवातीला खुप अडचणी आल्या. शेळ्या विकत आणल्या त्यावेळी मे महिना असुनही खुप मोठा वादळी पाऊस झाला. त्यावेळी त्यांची ३ महिने वयाची ७ पिल्ले निमोनियाने दगावली. त्यावेळी ते खुप नाराज झाले. पण त्यावेळी त्यांच्या वडिलांनी हिम्मत देवुन तु खचुन जाऊ नकोस, आलेल्या परिस्थितीवर मात कर, आताच तुझी परिक्षा सुरू झालीय असा आधार व सल्ला दिला. सोहेल यांनी शेळीपालन व्यवसाय सुरू केला. त्यानंतर १२ दिवसांनी त्यांच लग्न ठरल होतं. त्यांच्यासाठी आता दोन्हीही बाबी महत्वाच्या व गरजेच्या होत्या. स्वत:च लग्न असतानाही पुर्ण वेळ त्यांनी व्यवसायाला दिला. लग्नाचा एक दिवस अगोदरपर्यंत १२ शेळ्या आणि १० पिल्ले पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथील दवाखान्यामध्ये उपचारासाठी ॲडमीट होत्या. त्यावेळी ते पुर्ण वेळ शेळ्या जवळच राहायचे. सध्या त्यांचा शेळीपालन व्यवसाय चांगला सुरू असुन त्यांच्याकडे ४५ शेळ्या आणि ३० पिल्ले आहेत. शेळ्या वाढल्यामुळे त्यांनी मदतीसाठी एक मजुर ठेवला आहे. तो दिवसभर शेळ्या चारण्यासाठी नेतो. शेडमध्ये पैदास झालेल्या मादी पिल्लांचे चांगले संगोपन करतात व जास्तीचे मादी,नर यांची उदगीर बाजार पेठेत ते विक्री करतात. सध्या या व्यवसायातून सर्वसाधारपणे दोन लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न त्यांना मिळते. शेळ्यांना वेळेवर लसीकरण, मुबलक चारा व पाणी पुरवठा व जलद वजनवाढ हे त्यांच्या यशाचे सुत्र असल्याचे ते सांगतात. ते आपल्या यशाचे श्रेय त्यांचे वडील ज्यांनी त्यांना हिम्मत दिली आणि डॉ. प्रफुल्लकुमार पाटील ज्यांनी प्रत्येक अडचणीला मदत व मार्गदर्शन केले यांना देतात.

मार्गदर्शक

डॉ. प्रफुल्लकुमार पाटील

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री सोहेल मुजीब खतीब

खतीब कॉलनी, शाहु चौक, ता. उदगीर, जि. लातुर

मो.९८२३४२४११२





शेळीपालनातुन ज्ञानेश्वर वळले स्वावलंबनाकडे

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यामध्ये वसलेलं बापशेटवाडी हे छोटसं गाव.या गावातील १० वी पर्यंत शिक्षण झालेला युवक आहे ज्ञानेश्वर विठ्ठल मंदेवाड. मुखेड तालुक्याची पुर्वीपासूनची ओळख म्हणजे डोंगराळ व दुष्काळग्रस्त भाग. वर्षानुवर्षे होणारी शेतीतील उत्पन्नाची घट यामुळे या युवकास घरचा दैनंदिन खर्चही भागवणे कठीण होत होते कुटूंबाला शेतीसोबत काहीतरी आर्थिक बळ देणारा पर्याय हवा म्हणुन त्यांनी शेळीपालन व्यवसायाची सुरूवात केली. कुटूंबामध्ये ते, त्यांची पत्नी आणि त्यांची दोन मुलं. शेतीतुन मिळणारे उत्पन्न केवळ रू. ८०,०००/- त्यामुळे त्यांनी इतर ठिकाणी नोकरीसाठीही प्रयत्न केला. इतर कोणता व्यवसाय सुरू करायचा तर जास्त भांडवल लागत होते म्हणुनच त्यांनी कमी भांडवलामध्ये शेतीसोबत आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणुन शेळीपालन व्यवसायाची निवड केली. हा व्यवसाय सुरू करतानाच २०१५ मध्ये त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर येथे शेळीपालनाचे प्रशिक्षण घेतले. योग्यवेळी प्रशिक्षण घेतल्यामुळे शेळ्यांचे पालनपोषण कसे करावे, रोगनियंत्रण कसे करावे, जलद वजनवाढ कशी मिळवावी, योग्य चारा कोणता इ. बाबतचे ज्ञान त्यांना अवगत झाले.

शेळीपालन व्यवसायाची सुरूवात त्यांनी दहा शेळ्या व एक बोकड यापासून केली व नंतर हळुहळु यात वाढ करत शेळ्यांची संख्या २८ पर्यंत झाली. सुरूवातीला त्यांनी रू. २,५०,००० इतका खर्च करून फ्लॅटफार्म पद्धतीच्या शेडची उभारणी केली आणि शेळ्या व बोकड खरेदीसाठी रू. १,१९,००० इतकी रक्कम गुंतवणुक केली. त्यांना याकरीता कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नाही किंवा त्यांनी कोणत्याही बँकेचे कर्ज घेतलेले नाही. एवढ्या प्रमाणात त्यांनी भांडवल हे त्यांच्या भागीदार मित्रमंडळीकडुन मिळवले आहे.त्याकरिताच या फार्मचे नाव त्यांनी 'पांडव शेळीपालन' असे ठेवले आहे.

एकुण २० गुंठ्यामध्ये शेडची उभारणी तसेच चारा व्यवस्थापनासाठी मका व लसुणघास या चारा पिकांची लागवड केली. तसेच ते पावसाळा व हिवाळ्यामध्ये शेळ्यांना पडीक जमिनीवर उगवलेल्या गवतामध्ये चरायला सोडतात.त्यांचेकडे कोणतेही यंत्र नाही. ते शेळी/बोकडाची विक्री जागेवरून किंवा बाऱ्हाळी या गावाच्या बाजारामध्ये करतात.

त्यांनी या शेळीपालन व्यवसायाची कोठेही नोंदणी केलेली नाही. शेळीपालनामधुन त्यांना रू. १,२५,००० /- प्रतिवर्ष उत्पन्न मिळते. यातून त्यांच्या कौटूंबिक परिस्थितीमध्ये पुर्वीपेक्षा सुधारणा झाली आहे. तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगल्या पद्धतीने भागवण्यासाठी शेतीला पूरक व पोषक असणाऱ्या या शेळीपालन व्यवसायाची वाढ करायची त्यांची इच्छा आहे.

हा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित व मार्गदर्शन केल्याबद्दल ते डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांचे आभार मानतात. शेतीसोबत शेळीपालन हा जोडव्यवसाय म्हणुन सुरू केल्यास बेरोजगार म्हणवून घेण्याची आणि पैशासाठी इतरांकडे लाचार होण्याची गरज भासणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

मार्गदर्शक
डॉ. प्रफुल्लकुमार पाटिल
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री ज्ञानेश्वर विठ्ठल मंदेवाड
बाबशेटवाडी, ता. मुखेड, जि. नांदेड
मो.९३६२२४८९९४८



माफसू यशोगाथा



देविदासकरीता शेळीपालन व्यवसाय ठरला आर्थिक सक्षमतेचा मार्ग

लातुर जिल्हातील उदगीरपासुन केवळ ७ किलोमीटर अंतरावर वसलेलं नागलगाव हे गाव. शेती व मजुरी करून कूटूंबाचा उदरनिर्वाह चालवणारे श्री. देविदास संग्राम भाटकुळे याच गावातील रहीवासी आहेत . त्यांच्या कुटूंबामध्ये ते, त्यांची पत्नी, मुलगा व दोन मुली आहेत. त्यांचा मुलगा रोजंदारीवर कामाला जातो तर एका मुलीचे लग्न झाले असुन दुसरी मुलगी घरकाम करते. देविदासरावाकंडे केवळ एक एकर जमीन आणि तीही कोरडवाहु, त्यामुळे त्यातुनही पुरेसे उत्पन्न मिळत नाही. शिक्षण नसल्यामुळे नोकरी मिळणे शक्य नाही. भांडवला अभावी इतर काही व्यवसाय करता येत नाही. परंतु कुटूंबाचा उदरनिर्वाह तर चालु ठेवावा लागेल याचा विचार करून कमी भांडवल गूंतवणुक आणि गावाभोवती चरण्यासााठी असणारी जागा यानुसार शेळीपालन व्यवसाय त्यांनी निवडला. त्यांनी या व्यवसायाबद्दल कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नाही परंतु वेळोवेळी डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांचा सल्ला व मार्गदर्शन घेवुन त्यांचा व्यवसाय व्यवस्थित सुरू आहे. सन २००८ साली एक शेळी रू. ५०००/- ला विकत घेवून त्यांनी या व्यवसायाची सुरूवात केली. या शेळीपासुन सव्वा वर्षामध्ये त्यांना ५ पिल्ले मिळाली. त्यातील नर २० ते २५ किलो वजनाचे ६-७ महिन्या मध्ये झाल्यानंतर त्यांची त्यांनी विक्री करून उर्वरीत मादी करडांचे संगोपन केले. घरासमोरच सुरूवातीला वरती प्लास्टीक लावुन त्यांनी शेळ्यांचे संगोपन केले व आता साधे पत्राचे शेड तयार केले आहे. त्यांच्याकडे कोणतीही यंत्रे नाहीत. त्यांनी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नाही किंवा बँकेचे कर्जही घेतलेले नाही. ते स्वत:, गरजेवेळी त्यांचा मुलगा योगेश शेळ्यांचे संगोपन करतात. यामध्ये शेळया चरायला नेणे, पिलांना पाजवणे, चारा अपुरा असल्यास शेळ्यांना खुराक वाढवुन देणे अशी कामे ते करतात. सध्या १० X १० फुट जागेमध्ये त्यांच्याकडे ०६ शेळ्या व ०८ पिल्ले आहेत. त्यांना घरच्या घरी शेळ्या सांभाळुन वर्षाकाठी खर्च वजा जाता ६० ते ७० हजार रूपये नफा मिळतो. म्हणजेच महिन्याला रू. ५०००/- ते ६,०००/-मिळतात. यातुन घर खर्च भागवला जातो. मोठ्या बोकडांची व वयस्कर शेळ्यांची विक्री ते जागेवरूनच किंवा उदगीरच्या बाजारातुन करतात. वेळोवेळी मार्गदर्शन घेवुन मरतुकीविना व्यवसाय केल्यामुळे उत्पन्न वाढत आहे. भविष्यामध्ये ५० शेळ्यांचे संगोपन करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे.

हा व्यवसाय सुरू करण्यापुर्वी केवळ दुसऱ्यांच्या शेतात मोलमजुरी करून म्हणावे तेवढे उत्पन्न त्यांना मिळत नव्हते. शेळीपालन व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नामुळे त्यांच्या कुटूंबास आर्थिक आधार मिळाला. त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह भागून मुलीचे लग्नही त्यांना करता आले. कोणाकडेही उधारी मागण्याची गरज त्यांना भासली नाही. त्यांच्या यशाचे श्रेय ते त्यांची पत्नी, मुलगा व डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांना देतात. कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी आणि कमी भांडवल गुंतवणूकी मध्ये घरातील आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी शेळीपालन हा योग्य पर्याय असल्याने युवकांनी योग्य प्रशिक्षण घेवुन हा व्यवसाय करावा असा त्यांचा सल्ला आहे.

मार्गदर्शक
डॉ. प्रफुल्लकुमार पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री देविदास संग्राम भाटकुळे
नागलगाव, ता.उदगीर, जि. लातुर
मो.७७०९६५०९३९



माफसू यशोगाथा



शेळीपालन व्यवसाय करून माधवरावांनी केली कौटुंबिक अडचणीवर मात

कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा हा लातुर जिल्ह्याच्या सिमेला लागुनच असलेला जिल्हा. त्यामुळे या जिल्ह्यातील भालकी, औराद या तालुक्यातील लोकांचा उदगीरशी संपर्क नेहमी येतो. भालकी तालुक्यातील बसवनवाडी येथील रहिवासी असणारे श्री माधवराव अभंगराव तांबरवाडे यांच्या वडीलांच्या आजारपणामुळे शिक्षण जेमतेम दहावीपर्यंत झाले. वडिलांना टी.बी. हा आजार असल्यामुळे कुटूंबाची पुर्णत: जबाबदारी आली ती माधवरावावर. घरी आई वडिल, दोन बहिणी असल्यामुळे त्यांना पैसा मिळवण्यासाठी घर-गाव सोडता आले नाही. गावात राहुन व्यवसाय करावा म्हटलं तर त्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम. त्यातच शेतीतून मिळणारे उत्पन्नही अत्यल्प. या सर्व परिस्थितीमुळे त्यांनी घरच्या घरी राहुन शेळीपालन व्यवसाय कोणताही अनुभव किंवा मार्गदर्शन नसताना सुरू केला. हा व्यवसाय सुरू केल्यानंतर यामध्ये ७० पिल्ले दगावली. शेळ्यांना लसीकरण न केल्यामुळे शेळ्यांना पीपीआर आजार झाला. त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर येथील डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांचेशी मोबाईलवरून संपर्क केला व त्यानंतर प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीत त्यांना शेळीपालन व्यवसायाबद्दल सविस्तर मार्गदर्शनही मिळाले. त्याच बरोबर त्यांनी डॉ.पाटिल यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात ५ दिवसीय शेळीपालन व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले. यामध्ये त्यांना शेळ्यांसाठी लागणारा चारा, शेळ्यांची निवड, शेळ्यांना होणारे आजार व प्रतिबंधात्मक लसीकरण, शेळ्यांचा आहार अशा अनेक बाबींचे ज्ञान मिळाले. या ज्ञानाच्या मदतीने कोणत्याही शासकीय योजनेचा किंवा बँक कर्जाचा लाभ न घेता मित्रांच्या साह्याने ५० X ५० फुट चे शेड उभारले. सन २०१६ ला या व्यवसायाची त्यांनी खऱ्या अर्थाने ज्ञान घेवुन सुरूवात केली. चारा कुट्टीसाठी कुट्टी मशीन व चारा देण्यासाठी ट्रे खरेदी केले. प्रशिक्षणापुर्वी त्यांना चाऱ्याच्या समस्येलाही तोंड द्यावे लागले. परंतु त्यांनतर त्यांनी डी.एच.एन.६, मेथीघास,शेवरी या चारा पिकांची लागवड करून पोषक चारा उत्पादन केले. त्यांनी या व्यवसायाची सुरूवात १५ शेळ्यांपासुन केली आणि दोन वर्षानी त्यांच्याकडे शंभरपेक्षा जास्त शेळ्या झाल्या. नंतर २०१८ मध्ये गावात पाणीटंचाईमुळे शंभर शेळ्या त्यांनी विकल्या. सध्या त्यांचेकडे ३९ गाभण शेळ्या आहेत व भविष्यात चाऱ्याचे व्यवस्थित नियोजन करून त्यांना २०० शेळ्यापर्यंत वाढवायच्या आहेत. त्या दृष्टीने त्यांनी शेडची उभारणी सुरू केली आहे. सध्या घरच्या घरी ते स्वत: व पत्नी शेळ्यांचे संगोपन करतात. या व्यवसायातुन त्यांना महिन्याकाठी १० ते १५ हजार रूपये मिळत आहेत. ते आपल्या यशाचे श्रेय त्यांची पत्नी व सतत मार्गदर्शन करणारे डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांना देतात. शेळीपालन व्यवसाय करायचा असेल तर युवकांनी प्रशिक्षण घेवुनच या व्यवसायाची सुरूवात करावी असा संदेश ते युवकांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. प्रफुल्लकुमार पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री माधवराव अभंगराव तांबरवाडे
बसवनवाडी,ता. भालकी, जि. बिदर
मो. ८१९७९३००५१



माफसू यशोगाथा



प्रदिपने शेळीपालन व्यवसाय प्रशिक्षण संधीचे केले सोने

श्री प्रदिप शत्रुघ्न तामगाडगे शेतकरी कुटूंबात जन्मलेले असुन खाजगी नोकरी करतात. त्यांनी डिसेंबर २०१५ मध्ये विस्तार शिक्षण विभाग, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय,नागपूर मार्फत डॉ. सारिपुत लांडगे व डॉ. वैशाली बांठीया यांच्या मार्गदर्शनाखाली शेळीपालनावर आयोजित प्रशिक्षण पुर्ण केले. प्रशिक्षणातून शेळी व्यवसायाच्या तांत्रिक बाबी त्यांना शिकायला मिळाल्या जसे की, शेड कसे बांधायचे, शेळ्यांच्या विविध जाती, शेळ्यांची व्यवस्थापन पध्दती, शेळ्यांना होणारे विविध आजार व त्यांचे उपचार तसेच शेळ्यांचे विपणन व्यवस्थापन व शेळ्यांचा विमा इत्यादी आणि त्याचबरोबर शेळीपालन व्यवसायाबाबत आत्मविश्वास निर्माण झाला.

त्यांनी २६ जानेवारी २०१६ ला 'स्वरा गोट ॲन्ड पोल्ट्री फार्म' या नावाने वासी, ता. समुद्रपुर जि. वर्धा येथे प्राथमिक स्वरूपात व्यवसायाला प्रारंभ केला. अगदी साध्या टिनाच्या शेड मध्ये व्यवसायाला सुरूवात केली. आता पर्यत त्यांनी कुठल्याही बँकेचे कर्ज व शासकीय योजनेची मदत घेतली नाही. स्वत:जवळ जितका पैसा होता तेवढ्याच पैश्यात शेळ्या घेतल्या व शेड उभारले. प्रशिक्षणापासुन प्रेरणा घेत त्यांनी नागपुर सारख्या शहरात राहुनही गावात जास्त शेळ्या चारण्याची त्यांनी कधीही लाज वाटू न देता व न डगमगता शेळी पालनाचा व्यवसाय कायम ठेवला.

व्यवसायात फक्त २० शेळ्या व एका बोकडा पासून सुरूवात केली. त्या वेळेस २०x२० फुट टिनाचे शेड रु. ४१,५९१/- खर्च करुन बांधले तर २० शेळ्या १,१४,६७५/- रुपयात घेतल्या. त्यांच्याकडे आजही एकच कामगार आहे. नियोजन, मेहनती बरोबर संयम हे सर्वात मोठे यशाचे सुत्र असल्याचे ते सांगतात. शेळ्या खरेदी पासून तर शेड कसे उभारायचे, विविध आजार व त्याच्यावर उपचार, शेळी विक्री हे सगळे तंत्रज्ञान प्रशिक्षाणामुळे अवगत झाले. त्याचप्रमाणे वेळोवेळी तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी डॉ. सारिपुत लांडगे व डॉ. वैशाली बांठीया यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या ते आपला शेळीपालन व्यवसाय पिपळा- हुडकेश्वर, नागपूर येथे भाड्यानी घेतलेल्या शेळीपालन फार्मवर करत आहेत. व्यवसाय सुरू करण्यापुर्वी व सध्याचे राहणीमान व समाजातील स्थान प्रतिष्ठा यात बराच फरक त्यांना जाणवून आला. आज त्यांच्याकडे समाजात एक शेळी उद्योजक या दृष्टीने बघतात. यशाचे श्रेय ते मेहनत व व्यवसाय करण्याची जिद्द याला देतात.

मागील वर्षी त्यांनी एकूण २५ शेळ्या विकल्या आणि सर्व खर्च वजा करुन देखील त्यांना एकूण रु. १,८०,०००/- इतका निव्वळ नफा मिळाला आणि ते आता या व्यवसायात स्थिरावत आहेत. ते बेरोजगार युवकांना सल्ला देतात की, स्वत:मध्ये कष्ट करण्याची क्षमता, जिद्द असेल तरच या शेळी पालन व्यवसायात यावे. हा एक यशस्वी व्यवसाय आहे. यशस्वी शेळी पालन करून स्वत:ला सिध्द करा.

मार्गदर्शक
डॉ. वैशाली बांठीया व डॉ. सारिपुत लांडगे
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

श्री प्रदिप शत्रुघ्न तामगाडगे
पिपळा- हुडकेश्वर,ता.जि. नागपूर
मो.९७६४०९२९४९







शेळीपालन व्यवसायामध्ये तज्ञांच्या तांत्रिक सल्ल्याने जय यांनी साधली आर्थिक प्रगती

श्री जय सुधाकरराव राऊत मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेले. वडीलांचा व्यवसाय हार्डवेअरचा. त्यांचे शिक्षण बी.कॉम झालेले असुन त्यांना शेतीची आवड असल्यामुळे शेती व शेतीला पुरक लघुउद्योग म्हणून शेळीपालन या व्यवसायाकडे ते वळले. त्यांची सर्वात पहिली अडचण म्हणजे त्यांच्या कुटुंबात कोणाकडेच शेती नव्हती. मग त्यांनी शेती घेण्याचे ठरविले आणि तारणा,ता. कुही, जि. नागपूर येथे ७ एकर शेती त्यांनी विकत घेतली.

त्यांच्या रक्तातच व्यवसाय असल्यामुळे नोकरीकरीता त्यांनी कधीच प्रयत्न केला नाही. राज्य छोटे का असेना परंतु स्वत:चे असावे अशी छत्रपतींची आपल्याला शिकवण आहे व काळाची गरजही आहे. सध्या शेळी पालनाला तीन वर्षे पुर्ण झाली. परंतु व्यवसाय सुरू करण्यापुर्वी त्यांनी तब्बल दोन वर्षे प्रामुख्याने लोकं शेळीपालन जोमाने सुरू करतात परंतु तितक्याच लवकर बंदही करतात याचा अभ्यास केला.

ते वडिलांशी शेळीपालनाविषयी बोलले आणि त्यांच्या वडीलांनी शेळीपालन व्यवसाय करण्यास होकार दिला. त्यांनतर शेळीपालन व्यवसायाला जानेवारी २०१८ पासुन त्यांनी सुरूवात केली. एक वर्षानंतर फेब्रुवारी २०१९ मध्ये नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे शेळीपालनाचे त्यांनी प्रशिक्षण घेतले. व्यवसाय सुरूच असल्यामुळे प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षणामुळे त्यांनी तांत्रिक कौशल्य प्राप्त केले. प्रशिक्षणात बऱ्याच काही तांत्रिक बाबी लक्षात आल्या उदा. करडांचे संगोपन, गाभण शेळीचे नियोजन, लसीकरण, चारा व्यवस्थापन इत्यादी त्यानंतर त्यांनी ३० फुट X १०० फुट शेड ची उभारणी केली व त्याला २० लाख रू. खर्च आला. सुरूवातीला काही अडचणी आल्या.परंतु प्रशिक्षणाचा फायदा झाला. प्रशिक्षणा नंतर फोनवर डॉ. सुनिल कोलते व डॉ. वैशाली बांठीया यांच्या मार्गदर्शनाने अडचणी दुर झाल्या. डॉ. कोलते सरांनी वेळोवेळी शेळ्यांच्या रक्ताचे व लेंड्यांच्या नमुन्यांची तपासणी करून मार्गदर्शन केले. त्यामुळे मरतुकीचे प्रमाण फार कमी झाले. सर्व खर्च वजा जाता निव्वळ नफा १,५०,००० रूपये प्रति वर्षाला मिळतो.

बेरोजगार युवकांना त्यांची विनंती आहे की मातीशी जुळून रहा. आई वडिलांचा आशीर्वाद असेल तर तुमच्या मेहनतीला यश प्राप्त होणारच. भांडवल नसेल तर थोडक्यात सुरूवात करा. शेती व शेळी पालन ही काळाची गरज आहे, दोन्ही क्षेत्रात मागणी ही वाढतच आहे. त्यांच्या यशाचे श्रेय ते नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय,नागपूर, येथील प्राध्यापक डॉ. सुनिल कोलते आणि डॉ. वैशाली बांठीया यांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. सुनिल कोलते व डॉ. वैशाली बांठीया
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

श्री जय सुधाकरराव राऊत
तारणा, ता. कुही, जि.नागपूर
मो.९२२५२२०८४०







शेळीपालनाचे अवगत झाले तंत्र, तोच ठरला यशाचा मंत्र

निराळा ता. किनवट, जि. नांदेड येथील शेतकरी श्री महादेव राजेन्द्र ठाकरे यांचा जन्म १२ जुन १९९६ रोजीचा, शिक्षण बी.ए. पर्यंत पुर्ण झालेले असुन सरकारी नोकरी करण्याची त्यांची इच्छा होती पण त्यामध्ये अपेक्षित यश मिळाले नाही. त्यातच कुठल्याही खाजगी क्षेत्रात नोकरी करण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यामुळे त्यांनी ठरवले की कुठलातरी शेतीपूरक व्यवसाय करायचा आणि त्याचा मनस्वी ध्यास धरून प्रशिक्षण मिळवण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. त्यातच पुशवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी येथे घेण्यात येणाऱ्या शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षणाची माहिती फेसबुकच्या माध्यमातुन मिळाली. त्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधुन पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे ०३ दिवसीय प्रशिक्षणासाठी नोंदणी केली. ठरलेल्या तारखेला त्यांनी शास्त्रोक्त शेळीपालन या विषयावरील प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले. प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर शेळीपालन व्यवसाय करण्यासाठी ते सक्षम झाले. त्यांचा आत्मविश्वास दृढ झाला आणि सुरूवातीला ०६ शेळ्या , ०६ करडे व ०१ बोकड खरेदी करून दि. ०७ एप्रिल २०२० रोजी त्यांनी व्यवसायास सुरूवात केली. हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना साधारणपणे ०२ लाख ३० हजार रू. इतका खर्च आला. व्यवसाय चालु करण्या आधी त्यांना बऱ्याच अडचणी आल्या पण त्या अडचणीवर मात करण्यासाठी वेळोवेळी त्यांना डॉ. मो. बसीर सिद्दीकी, पशुउत्पादन व्यवस्थापन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांचे महत्वाचे आणि उपयुक्त मार्गदर्शन मिळत गेले आणि त्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात आणखीच भर पडली आणि व्यवसाय देखील वाढत गेला. सद्यस्थितीत त्यांच्या कडे ३० शेळ्या आहेत आणि त्यातील काही बोकडांची विक्री करून रू. ३५,००० इतका नफा मिळाला.

भविष्यामध्ये त्यांना जवळपास शंभर शेळ्यांचे पालन करावयाचे असुन त्यामधुन दरवर्षी ६० ते ८० करडांचे उत्पादन निघावे असा त्यांचा उद्देश आहे आणि त्या अनुषंगाने त्यांची वाटचाल पुढे चालु आहे. पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी या ठिकाणी घेण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा त्यांना फायदा झाला असे मत श्री ठाकरे यांनी व्यक्त केले. त्यांच्या यशाचे श्रेय ते डॉ. मो. बसीर सिद्दीकी, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांना देतात. त्यांच्या अनमोल मार्गदर्शनामुळे ते शेळी पालनाकडे वळले. आणि त्यांच्या आयुष्याला एक वेगळी दिशा मिळाली. युवकांनी सविस्तर प्रशिक्षण घेऊन नंतरच स्वत:शेळीपालन व्यवसाय सुरू करावा व स्वत:ची सामाजिक व आर्थिक उन्नती साधावी असा संदेश देतात.

मार्गदर्शक
डॉ. मो. बसीर सिद्दीकी
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

श्री महादेव राजेन्द्र ठाकरे
निराळा, ता.किनवट, जि. नांदेड
मो. ७२१८७१७२६०





शेळीपालन व्यवसायातुन सुरेश यांची प्रगतीकडे वाटचाल

श्री सुरेश रामकिशनराव कनके, रा. शिर्सी (खुर्द) लोहगाव ता. जि. परभणी येथील रहिवासी, त्याचा जन्म १० मे १९६८ रोजीचा असुन सध्या ते शेती व शेतीपुरक व्यवसाय करतात. बदललेले वातावरण, पावसाची अनियमितता, पिकांवरील येणारे विविध रोग या सर्व गोष्टींमुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही आणि म्हणुन शेती व्यवसायावर पुर्णपणे अवलंबून राहणे त्यांच्यासाठी जोखमीचे झाले होते. त्यातच शेती सोबत एखादा शेती पूरक व्यवसाय करण्याच्या शोधात ते होते व पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे शास्त्रोक्त शेळी पालन प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्वरीत महाविद्यालयाशी संपर्क करून त्यांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली व दिनांक २४ ते २६ सप्टेंबर २०१६ दरम्यान तीन दिवसीय शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षण त्यांनी यशस्वीरित्या पुर्ण केले. प्रशिक्षण पुर्ण केल्या नंतर त्यांचा आत्मविश्वास वाढला व प्रथमत: त्यांनी १० शेळ्या व ०१ बोकडापासून शेळीपालन व्यवसायाचा श्री गणेश केला. हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना ०१ लाख ५० हजार रूपये इतका खर्च आला. सुरूवातीला हा व्यवसाय सुरू करतांना त्यांना बऱ्याच अडचणी आल्या. परंतु त्यांना वेळोवेळी डॉ. मो. बसीर सिद्दीकी व डॉ. एम. डी. खरवडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आणि त्यामुळेच आलेल्या अडचणीवर मात करत शेळीपालन व्यवसाय त्यांनी यशस्वीरीत्या सुरू केला. सध्या हा व्यवसाय पाच गुंठे जागेत पसरलेला आहे.

आतापर्यंत त्यांनी २५ ते ३० करडांची विक्री केली असुन, अजून २५ करडे विक्रीसाठी त्यांच्या कडे उपलब्ध आहेत. २५ ते ३० करडांच्या विक्रीतून त्यांना ०१ लाख ४० हजार रूपये फायदा झाला. सध्या त्यांचा हा व्यवसाय एकदम सुरळीतपणे चालु असुन भविष्यात त्यांना या व्यवसायात भरपुर संख्येने शेळ्या वाढवायचा त्यांचा मानस आहे. कष्ट, वेळोवेळी मिळालेले सहकार्य आणि घेतलेले प्रशिक्षण हेच त्यांच्या यशाचे गमक आहे असे ते मानतात. तसेच त्यांच्या यशाचे सारे श्रेय हे डॉ. मो. बसीर सिद्दीकी व डॉ. एम. डी. खरवडकर, पशुउत्पादन व्यवस्थापन विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांना देतात. तरूण पिढीने शास्त्रीय पध्दतीने शेळीपालन करावे व स्वावलंबी व्हावे असा सल्लाही ते देतात.

मार्गदर्शक
डॉ. मो. बसीर सिद्दीकी व डॉ. मकरंद खरवडकर
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

श्री सुरेश रामकिशनराव कनके
रा. शिर्सी (खुर्द), लोहगांव, ता. जि. परभणी
मो. ९५१८७५५०३३





माफसू यशोगाथा



शेळीपालनात यशस्वी झाले आबा

श्री आबा शिंदे राहणार उपळाई (बु) यांचे शिक्षण हे बारावी पर्यंत झालेले असून त्यांनी दुग्ध व्यवसायाचा डिप्लोमा कोर्स केलेला आहे. आबा शिंदे यांची उपळाई शिवारात पाच एकर शेती आहे, परंतु पारंपारिक पिकातून त्यांना अपेक्षित आर्थिक उत्पन्न मिळत नव्हते. त्यामुळे परिसरातील बाजारपेठेचा अभ्यास करून त्यांनी पूरक व्यवसाय म्हणून घरगुती स्तरावर उस्मानाबादी शेळीपालन सुरू केले. शेळीपालनात सुरूवातीला त्यांना बऱ्याच अडचणी आल्या. सुरूवातीला चाऱ्यांचा आणि शेळ्यांचा मेळ बसत नव्हता . त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे जाऊन १८ ते २० डिसेंबर, २०१९ च्या दरम्यान कॉलेज च्या प्रक्षेत्रावर डॉ. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक शेळी पालनाचे प्रशिक्षण घेतले. जर शेळी पालन यशस्वी करायचे असेल तर सर्वात महत्वाचे म्हणजे पैदाशीच्या बोकड आणि शेळींची निवड अतिशय सक्षमपणे करणे गरजेचे असते, शेळ्या आजारी पडू नयेत तसेच त्यांची वाढ उत्तम व्हावी यासाठी नियमित लसीकरण आणि जंत निर्मूलन गरजेचे आहे हे प्रशिक्षणातून लक्षात आले.

शेळीपालन करताना कमीत कमी खर्च कसा होईल यासाठी प्रशिक्षणात दिलेल्या विविध चाऱ्यांच्या जातीची माहिती वापरून मका, सुबाभूळ, शेवरी आणि घास लागवड शेतात करून चारा खरेदीवरील अनावश्यक खर्च कमी केला. शेळ्यांना वजन वाढीसाठी प्रशिक्षणातील खाद्याचे सुत्र वापरले.

शेळ्यांचे शेड बांधताना प्रशिक्षणात सांगितलेली उपयुक्त माहिती तसेच दाखवलेली मॉडेल वापरून कमी खर्चात गोठा उभारला. यासाठी प्रामुख्याने त्यांनी उपलब्ध साधनांचा अधिकाधिक वापर केला. बोकड विक्री नगानुसार न करता ती त्यांच्या जिवंत वजनावर केली तर अधिक नफा मिळेल हा संदेश प्रशिक्षणातुन त्यांना मिळाला आणि त्याचे त्यांनी तंतोतंत पालन केले. प्रशिक्षणात सांगितल्याप्रमाणे त्यांनी गावच्या जत्रा, गटारी अमावस्या, दसरा, होळी, बकरी ईद आणि नविन वर्षाची सुरूवात यावर लक्ष केंद्रीत केले. वर्षाला साधारपणे २५ ते ३० बोकडांची विक्री करून त्यांनी दोन लाख दहा हजार रूपये उत्पन्न मिळवले यापैकी ९५ हजार रूपये हे व्यवस्थापनावर खर्च झाले. सर्व खर्च वगळता साधारपणे एक लाखाच्या वर निव्वळ नफा शिल्लक राहिला.

आबा पुढे म्हणतात आज त्यांच्याकडे एक पैदाशीचा बोकड, वीस मोठ्या शेळ्या आणि पंधरा करडे आहेत आणि यातील नऊ शेळ्या गाभण आहेत. आबांचा अनुभव आहे आपण जेव्हा नवीन शेळीपालन सुरू करतो, त्यावेळेस बऱ्याच वेळा आपण आपल्या चुकातून शिकतो. परंतु आपण जर शेळीपालनासाठी शास्त्रीय प्रशिक्षण घेतले तर बरेचसे आपले नुकसान आपण टाळु शकतो.

मार्गदर्शक
डॉ. गोकुळ सोनवणे व डॉ. विद्या निंबाळकर
क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

श्री. आबा नागनाथ शिंदे
उपळाई (बु), ता. माढा, जि. सोलापुर
मो. ७६२०७६७८६३





माफसू यशोगाथा



इंद्रायणी बोअर शेळी प्रकल्प बारामती : शेळी पालन व्यवसायातुन वार्षिक उत्पन्न २० लाख रूपये

श्री.सुनिल रामदास वायळ रा. कोऱ्हाळे, खुर्द यांनी पदवीपर्यतचे शिक्षण झाल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता सन २०१२ मध्ये शेती व दुधव्यवसायाबरोबर शेळीपालन व्यवसाय सुरू करण्याचे ठरवले. शेळीपालन व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण निमकर शेळी प्रकल्प व क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे पुर्ण केले व बोअर शेळी पालन व्यवसाय करण्यास सुरूवात केली. श्री. सुनिल व पत्नी सौ. ज्योती या व्यवसायात स्वत: काम करीत असून शेळ्यांचे सर्व व्यवस्थापन व विक्री व्यवस्थापन सुध्दा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून यशस्वीपणे करित आहेत.

बोअर जातीच्या शेळ्यांची उच्च रोगप्रतिकार शक्ती तसेच सर्वोत्तम प्रजनन क्षमता व वजन वाढीचा दर यामुळे सदर शेळींची या व्यवसायाकरीता निवड केली व आपल्या आईच्या नावाने इंद्रायणी बोअर शेळी प्रकल्प २०१२ मध्ये सुरू केला. बोअर शेळीसाठी बंदिस्त गोठा सर्वोत्तम असलेने टप्याटप्याने ८ लाख खर्च करून दोन शेडची उभारणी केली. वयानुसार मादी, नर करडे, गाभण आणि व्यालेल्या शेळ्या,आजारी व भाकड शेळयांसाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था केली असून त्यामुळे चांगल्या प्रकारचे व्यवस्थापन करणे शक्य झाले आहे. शेळ्यांसाठी चारा, खुराक, पाणी वेळेनुसार व शास्त्रीय पध्दतीने दिल्याने शेळयांची वाढ चांगली व प्रजनन क्षमता जास्त मिळविणे शक्य झाले आहे. शेळी पालनातील एकुण अर्थकारणाचा अभ्यास करून मटणासाठी शेळी पालन न करता पैदाशीसाठी व्यवसाय वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सुरूवातीला उच्च वंशावळीच्या २ शेळया बोकडांची, निमकर शेळी प्रकल्प येथुन रू.१,८४,००० मध्ये खरेदी केली. सदर व्यवसायासाठी लागणारे भांडवल ऊस शेती व दुधव्यवसायातील भांडवल टप्याटप्याने वळवुन कोणत्याही प्रकारचे कर्ज प्रकरण न करता उभे केले आहे. एकदम शेळया खरेदी न करता उच्च वंशावळीच्या शेळया व बोकडाचा संकर करून स्वत: प्रकल्पावर पैदास करून उत्पादन खर्च कमी केला. श्री. सुनिल वायळ यांनी शेळीपालन व्यवसाय पैदाशीच्या नर व मादी यांच्या करडांची पैदास करून आजुबाजुच्या नवीन व्यवसायीकांना तसेच इतर राज्यातील शेळी पालकांना आकर्षित करून स्वत:चा एक ब्रॅन्ड तयार केला आहे. सद्यस्थितीत त्यांच्या नराला २००० हजार रूपये व मादीला ३००० रूपये प्रती किलो भाव मिळत असुन सदरची करडे ३ महिन्यांचे व २५ किलो वजनांचे झाल्यानंतर विक्री करीत आहेत. सदर नर व मादी करडांची विक्री आगाऊ बुकींगने होत असून प्रत्येक शेळीपासुन १६ महिन्याला २ वेत मिळत असल्याने गेल्या ३ वर्षापासुन दरवर्षी २० लाख रूपये मिळत आहेत. शेळयामधील सुलभ प्रजनन व्यवस्थापन हा यशाचा प्रमुख घटक असून यासाठी सोनोग्राफी तज्ञ डॉ. अजित माळी यांची खुप मदत होत आहे. शेळी भरवल्यांनंतर पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे जाऊन ३० दिवसांची गर्भधारणा तपासणी करणे हे सुत्र गेले ३ वर्ष अखंडीतपणे चालु आहे. सोनोग्राफी तपासणी केल्याने शेळी गाभण आहे किंवा नाही, तसेच गर्भाशयात किती पिल्ले आहेत याची अचुक माहिती मिळण्याबरोबर गर्भाशयास व स्त्री बिजांडात काही दोष आहे किंवा नाही हे समजते. त्यामुळे प्रत्येक शेळीपासुन १६ महिन्यांत २ वेत घेणे शक्य होत आहे.

शेळीपालन व्यवसाय यशस्वीपणे राबविल्यामुळे शेळीपालकांमध्ये मानसन्मान राज्यातच नव्हे तर इतर राज्यातही मिळत असुन यामुळे या व्यवसायात उतरणारे नवीन लोक दररोज शेळी प्रकल्पाला भेट देत आहेत. शेळी पालन व्यवसाय फायदेशीर करण्यासाठी शास्त्रीय दृष्टीकोन, आरोग्य व्यवस्थापन, सुलभ प्रजनन व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून पैदाशीच्या नर व मादी शेळयांची विक्री करणे हा यशाचा मुलमंत्र होय. सदर व्यवसाय यशस्वी करण्यासाठी क्रांतिसिह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथील डॉ. अजित माळी व निमकर शेळी प्रकल्पाचे श्री. मल्हारी ढेंबरे यांची खुप मदत होत आहे.

मार्गदर्शक
डॉ. अजित माळी
क्रांतिसिह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

श्री सुनिल रामदास वायळ
कोऱ्हाळे खुर्द, ता. बारामती,जि. पुणे
मो. ७०५७५२३३५३





माफसू यशोगाथा



कुक्कुटपालनातुन व्यावसायीक समृध्दीकडे

श्री इम्रान खान, रा. पातूर, जि. अकोला हे मागील काही वर्षापासून कुक्कटपालन व्यवसाय करत आहेत. परंतु कुक्कुटपालनाविषयी अधिक माहिती मिळावी यासाठी १७ जून २०१८ दरम्यान कुक्कुटपालन शास्त्र विभाग, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला. येथे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर अधिक जोमाने हा व्यवसाय करण्याचे ठरविले. नवीन कोंबड्यांचे घर बांधतांना प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या तांत्रिक ज्ञानाचा पुरेपूर वापर केला.

त्यांनी ६००० ब्रॉयलर पक्षांसाठी २१६ फुट लांब व ३० फुट रूंदीचे आधुनिक शेडचे बांधकाम पुर्ण केले. लहान पिलांचे ब्रुडिंग व्यवस्थापन करतांना तापमान नियंत्रित इलेक्ट्रिक ब्रुडरचा वापर प्रामुख्याने केला. तसेच व्यवस्थापन,फॉगर, स्प्रिंक्लर्स, स्वयंचलित पाण्याची भांडी अशाप्रकाराच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपुर उपयोग केला. फार्मवर स्वत:ची खाद्य गिरणी उभारण्यात आली असुन ते स्वत:च खाद्य निर्मिती करीत आहे. कुक्कुटपालन व्यवसायात स्वत: च खाद्य बनविल्यामुळे निश्चितच नफा हा अधिक होतो हा त्यांना अनुभव येत आहे. कारण व्यवसायात खाद्यावरील खर्च जास्त असल्यामुळे त्यातील कमी केलेला खर्च हा आर्थिक नफ्या मध्ये दिसतो.

प्रशिक्षणादरम्यान विविध विषयांवर तज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाचा त्यांना लाभ झाला. मुख्यत: रोग नियंत्रणासाठी शेडचे निर्जंतुकीकरण (फ्युमिगेशन) कशा पध्दतीने करावे व त्याचे फायदे कोणते ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. मेहनत, चिकाटी व कष्ट यामुळेच ते यशस्वी होऊ शकले असे त्यांना वाटते. परिसरातील शेतकरी देखील या व्यवसायाबद्दल त्यांच्या कडून माहिती घेतात.

या व्यवसायातून आजमितीला त्यांना ९ ते १० लाख रूपये वार्षिक उत्पन्न मिळत आहे. प्रशिक्षणामुळे या व्यवसायातून अधिक नफा कसा मिळवता येईल या बाबतच्या नवीन गोष्टी त्यांना आत्मसात करता आल्या. अशाप्रकारे कुक्कुटपालन व्यवसाय हा त्यांच्या जीवनाचा शाश्वत आधार झाला आहे. परिसरातील इतर शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे वळावे या साठी ते स्वत : प्रयत्नशील आहेत.

श्री इमरान खान
पातुर, जि. अकोला
मो. ७२१९२२२२५२

मार्गदर्शक
डॉ. सतिश मनवर व डॉ. काकासाहेब खोसे
स्नातकोत्तर पशुवैद्यकीय व पशुविज्ञान संस्था, अकोला.



माफसू यशोगाथा



कुक्कुटपालनातुन मोहम्मद झाले आत्मनिर्भर

मोहम्मद ओसामा अर्सलान खान, रा. फिरदौस कॉलोनी अकोला, यांचे शिक्षण एम.एस.सी. (आहार शास्त्र) झाले असुन त्यांनी स्वत: आहार तज्ञ म्हणुन मुंबई व दुबईत कार्य केले. दुबईतुन परत आल्यावर त्यांना स्वत:चा व्यवसाय करावयाचा होता. त्यामुळे त्यांनी कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी शास्त्रीय ज्ञान घेण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण घेण्याचे ठरविले.

या व्यवसायासाठी स्नातकोत्तर पशुवैद्यकीय व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे कुक्कुट पालन या विषयीचे पाच दिवसाचे प्रशिक्षण डिसेंबर-२०१७ मध्ये घेतले. या प्रशिक्षणामध्ये शेडचे बांधकाम, पक्षांचे लसीकरण, पक्षांची निगा, पक्षांच्या खाद्यांची माहीती तसेच जैवसुरक्षेबद्दल माहीती आत्मसात केली. सद्यस्थितीत गोल्डन बर्ड लाईवस्टॉक फार्म या नावाने अकोला जिल्हातील बार्शिटाकळी या गावाहून सुमारे तीन किलोमीटर दुर पिंजर रोडवर फार्म टाकला. दुबईवरून परत आल्यावर त्यांच्या वडीलांनी या व्यवसायासाठी प्रोत्साहीत केले. वडीलांकडुन अर्थ सहाय्य घेऊन स्वत:च्या शेतीमध्ये हा व्यवसाय सुरू केला. घरातील सर्वच सदस्य त्यांना या व्यवसायात मदत करतात. त्यांचा लहान भाऊ इंजिनियरची नोकरी सोडुन या व्यवसायात मदत करीत आहे. कोणताही व्यवसाय सुरू केला असता अडचणी येतात पण पुर्णपणे चिकाटीने या व्यवसायात आलेल्या अडचणींवर त्यांनी मात केली. स्वत: फार्म वर जाण्यासाठी खडीकरणाचा रस्ता तयार करून घेतला. तसेच पक्षांकरीता लागणारे खाद्य देण्यास ऐनवेळी वितरकाने नकार दिल्याने स्वत: पक्षांचे खाद्य तयार करून यशस्वीपणे व्यवस्थापन केले.

सद्यस्थितीत त्यांच्या फार्म मध्ये तीन हजार पिल्ले असुन खर्च वजा जाता व्यवसायात दरवर्षी ५ लाख रू. निव्वळ नफा मिळतो. कोणताही व्यवसाय करतांना कोणतीही लाज न बाळगता मेहनत घेतली तर निश्चितच फायदा होतो, यावर त्यांचा विश्वास आहे. प्रशिक्षणामुळे निश्चितच व्यवसाय करण्याचा आत्मविश्वास वाढला व प्रशिक्षणातील ज्ञानाचा आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी उपयोग झाला. त्यांचा तरूण युवकांना एक सल्ला आहे की मोठ्या कंपनीत नोकर होण्यापेक्षा छोट्या व्यवसायाचे मालक होणे जास्त मानाचे आहे. आत्मनिर्भर बनण्यासाठी कुक्कुटपालन हा एक योग्य पर्याय आहे.

मार्गदर्शक
डॉ. सतीश मनवर व डॉ. मुयरा गोळे
स्नातकोत्तर पशुवैद्यकीय व पशुविज्ञान संस्था, अकोला

श्री मोहम्मद ओसामा अर्सलान खान
फिरदोस कॉलोनी, अकोला
मो. ९९७५७८६५३७



माफसू यशोगाथा



कृषी पदवीकाधारक बनला कुक्कुट व्यावसायीक

श्री.सुधीर बजरंग जगदाळे, थादाळे ता. माण येथिल कृषी पदवीकाधारक असुन शेती हा आई वडिलांचा पारंपारिक व्यवसाय आहे. सुधीर जगदाळे यांनी उरळीकांचन येथील डॉ बी. व्ही. राव कुक्कुट व्यवस्थापन व तंत्रज्ञान संस्थेमधून सहा महिने प्रशिक्षण घेऊन, तद्नंतर जवळपास ५ वर्षे व्यंकीज कंपनीच्या ब्रॉयलर पॅरेन्ट स्टॉकच्या ६०,००० पक्षांचे व्यवस्थापक म्हणून मासिक ७ हजार रुपये पगारावर नोकरीची सुरुवात केली. जी पाच वर्षात त्यांची कमाई जेमतेम मासिक १२ हजार रुपयेपर्यत पोहोचली. व्यवस्थापनातील उत्तम अनुभव व तोटका पगार पाहता, त्यांना स्वत: घरी कुक्कुटपालन शेड बांधून व्यवसाय सुरू करण्यासाठी डॉ. रविंद्र जाधव यांनी मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. कुक्कुटपालन व्यवसाय त्यांनी २०१७ साली सुरु केला. त्यांनी १००फुट X ३० फुट आकाराचे सर्व सोयींनीयुक्त असे शेड ४,३०,००० रुपये खर्च करून बांधले. तद्नंतर कुक्कुटपालन व्यवसाय कंपनीबरोबर करार करून ३०००-३३०० देशी पक्षांचे (०.९० चौ.फुट प्रति पक्षी) विक्रीपर्यत व्यवस्थापन करण्यास सुरवात केली. यामध्ये पक्षी, लागणारे खाद्य, लसीकरण व औषधे पुरवण्याचे काम कंपनी करते. तर मालकास फक्त स्वत:चे शेड, वीज, खाली अंथरण्यासाठी लागणारी तुस, पाण्याचे नियोजन, नियमित खाद्य व लसीकरण यांचे व्यवस्थापन करावे लागते. व्यवस्थापनामध्ये ब्रॉयलरप्रमाणे देशी पक्षांना जास्त देखरेख करावी लागत नाही. त्यामुळे जास्त मनुष्यबळ लागत नाही. व्यवसायाची जबाबदारी ते स्वत: सांभाळतात. वडील त्यांना पक्ष्यांच्या देखभालीत मदत करतात. पक्षांच्या व्यवस्थापनात सुरुवातीच्या काळात अडचण आली. पण तज्ञांकडून योग्य माहिती मिळवून त्यावर मात केली.

सध्या त्यांचेकडे ३५०० पक्षी आहेत.साधारणपणे एका वर्षात सरासरी ३-३.५ बॅच तयार होतात. तीन महिन्यात पक्षांचे वजन १-१.२५ कि.ग्रा. होते. कंपनीकडून प्रतीपक्षी १५ रुपये व्यवस्थापन खर्च म्हणून मिळतो जो की मरतुक पकडून प्रती बॅच ४५,००० रू. होतो. तसेच कुक्कुट खतापासून प्रती वर्षी रु.१५,००० चे उत्पन्न मिळते.अशाप्रकारे एका वर्षात जवळपास १,९५,००० ते २,१०,००० रूपये उत्पन्न मिळते जे सरासरी १७,५०० रू.प्रति महिना होते. अशा प्रकारे कंपनीद्वारे पुरविलेले पक्षी स्वत: वाढवून कमी मनुष्यबळात घरी राहून नोकरीपेक्षा जास्त उत्पन्न मिळविण्यात सुधीर यशस्वी झाले. भविष्यात अजून नवीन शेड तयार करण्याचा त्यांचा मानस असून त्यांची व्यवसायातील प्रगती पाहून परिसरातील दोन युवकही या व्यवसायात उतरले आहेत.

त्यांच्या यशाचे श्रेय डॉ. रविंद्र जाधव यांना देतात आणि कुक्कुटपालन व्यवसायात युवकांना अनेक संधी आहेत, त्यांचा युवकांनी फायदा घ्यावा, असा सल्ला ते देतात.

मार्गदर्शक
डॉ. रविंद्र जाधव
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री सुधीर बजरंग जगदाळे
थादाळे, ता. माण, जि. सातारा
मो. ७७६९०८८८१७





अविनाशने नोकरी सोडून व्यावसायिक कुक्कुटपालनातुन साधली प्रगती

अविनाश भालचंद्र कुरेकर, वरोरा, जि. चंद्रपुर येथील रहीवासी आहेत. त्यांचे वडील शासकीय नोकरीतुन निवृत्त झाले व त्यांचाकडे एकूण ८ एकर शेती आहे. त्यामध्ये भाजीपाला, तुर, कापूस आदी पिके घेतात. शेती विषयी आवड व शेतीस पुरक व्यवसाय आणि शहरी भागात कडकनाथ पक्ष्यांच्या मांसाला असलेली मागणी यामुळे गावरान कोंबड्या ५०० आणि ५ टर्की पक्षी याप्रमाणे घऊन कुक्कुटपालनास सुरूवात केली. या व्यवसायासाठी डॉ. नरेन्द्र खोडे, सहाय्यक प्राध्यापक पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर आणि डॉ. व्हि.एस.कामडी, भद्रावती यांचेकडून पक्षी खरेदी, शेडचे बांधकाम आणि पक्षांचे व्यवस्थापन याबाबत माहिती घेतली. सन २०१५ मध्ये 'अर्जुन हेन फार्म' नांदुरा, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ येथे सुरूवात केली. शेडचे बांधकाम व इतर सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रू.५ लाख ७० हजार इतके एच.डी.एफ.सी. बँकेचे वरोरा शाखेतून कर्ज घेतले.

धाकटा भाऊ व ते स्वत: व्यवसायासाठी काम करतात. भाऊ शेती सोबत कुक्कुटपालनाचे व्यवस्थापन सांभाळतो व ते व्यवस्थापनासोबत पक्ष्यांची विक्री सांभाळतात. शेतात वीज जोडणी नव्हती. त्याबाबत बराच पाठपुरावा करावा लागला. फार्म गावापासून दुर असल्याकारणाने मजुर मिळणे अवघड होते. शेतातच शेड बांधलेले आहे. शेती व पक्षीपालनाकरीता दोन मजुर कामास आहे. अंडी उबवणूकीचे छोटे सयंत्र घेतलेले आहे. फार्म वरून पक्ष्यांची किरकोळ विक्री केली जाते. लगतच्या कळंब आणि यवतमाळ या शहरात चिकन सेंटरला पक्ष्यांची विक्री करण्यात येते. चार महिन्यात पक्षी विक्रीयोग्य होतात. दर चार महिन्याला १५०० कडकनाथ पक्ष्यांपासून (सरासरी वजन १.२ किग्रॅ) प्रति किलोग्रॅम रू. ४०० या दराने सरासरी सात लाख रूपये उत्पन्न मिळते. त्यातून पिल्ले खरेदी ९५ हजार रूपये, खाद्य १ लाख ८० हजार रूपये, २० हजार रूपये औषधी आणि उपचार, मजुरी ६४ हजार रूपये, २० हजार रूपये विद्युतबील, शेडचे रिपेअरींग व मेंटेनन्स ६००० रूपये, जवळपास ६० हजार रूपये किमतीच्या पक्ष्यांची मरतुक आणि कर्जापोटी मुद्दल आणि व्याज मिळून ५७ हजार रूपये असा चार महिन्याचा एकंदरीत ४ लाख १८ हजार रूपये खर्च वजा केला असता दर महिन्याला सरासरी ६५ हजार रूपये निव्वळ नफा होतो.

मेहनत आणि चिकाटी सोबत शास्त्रशुद्ध तंत्राचा अवलंब आणि योग्य नियोजन, हेच यशाचे गमक आहे असे ते म्हणतात.भविष्यात पिल्ले, अंडी व खाद्य विक्री करून त्यायोगे व्यवसाय अधिक वृद्धिंगत करण्याचा मानस आहे. सोबत उस्मानाबादी शेळीपालन व्यवसाय सुध्दा सुरू करणार आहेत.

कुक्कुट पालनातून मिळणाऱ्या खताचा वापर शेतीत केल्यामुळे शेती उत्पन्नात वाढ झालेली आहे. कुक्कुट व्यवसायातून आर्थिक प्रगती झाली. तरूण युवकांनी शेती आणि त्यास पुरक असलेल्या पशुपालन वा इतर जोडधंद्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, शासकीय मदतीवर फार विसंबून राहु नये आणि मेहनतीला पर्याय नाही हे कदापी विसरू नये, असा सल्ला ते बेरोजगार युवकांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. नरेन्द्र खोडे
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री अविनाश भालचंद्र कुरेकर
नांदुरा, ता. बाभूळगाव, जि. यवतमाळ
मो. ७७१९०६१६१६



माफसू यशोगाथा



वराहपालन व्यवसायातुन समृध्दीकडे

श्री अमितकुमार एलफीक जोसेफ, वय वर्ष ४४, रा. दत्तवाडी, नागपूर यांनी कोंढागरी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर येथे ग्रेस लाईव्हस्टॉक फार्म या नावाने सन २०१७ मध्ये वराह पालन सुरु केले. वराह पालन व्यवसायात स्वत:ची आवड आणि या व्यवसायात अधिक नफा असल्यामुळे या व्यवसायाची निवड केली. या व्यवसायाचे १५ दिवसाचे पायाभूत प्रशिक्षण सन २०१६ मध्ये अलीगढ, उत्तरप्रदेश येथील शासकीय पशुसंवर्धन विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या वराह पालन संस्था, रामघाट रोड येथे पुर्ण करुन हा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायात कुटुंबातील दुसरी कुठलीही व्यक्ती कार्य करत नसुन ते स्वत: व दोन मजुर काम करतात. हा व्यवसाय सन २०१७ पासुन १० वराह सोबत सुरु करून आज स्थितीला १०० पेक्षा जास्त वराह आहेत. व्यवसायाच्या सुरुवातीला त्यांनी स्वत: एकूण रू. ६ लाख गुंतवणूक केली. ३००० चौ. फुटांचा गोठा बांधून १० युनिट पासून प्रतीवर्षी युनिट वाढत गेले व विक्रीपण सातत्याने होत गेली. व्यवसायात स्थानिक मांसाकरीता मागणी कमी आहे पण नर आणि मादयांच्या युनिटची मागणी जास्त आहे आणि उर्वरीत वराह प्रामुख्याने दिल्लीला नगा प्रमाणे (लाईव्ह ॲनिमल) विकण्यात आले. या व्यवसायाचे त्यांच्याकडे नोंदणी प्रमाणपत्र व उद्योग आधार नोंदणी असल्याने विक्रीला कुठलीही अडचण भासली नाही. मजुरांच्या वेतनावर वार्षिक रू. १,५०,०००/- खर्च होतो आणि इतर सर्व बाबीवरील वार्षिक खर्च रू. ३,६०,०००/- असून निवळ वार्षिक नफा रू. ३,५०,०००/- इतका आहे. सुरूवातीपासूनच व्यवसायात आणि उत्पन्नात वाढ होत गेली. या व्यवसायात स्वत:चे श्रम व बाजारपेठेचे ज्ञान हे यशाचे सुत्र आहे.

सध्याची प्रक्षेत्राची जागा ही भाड्याने घेतलेली आहे आणि भविष्यात स्वत:ची जागा विकत घेऊन २०० ते ५०० युनिट पर्यंत व्यवसाय वाढविण्याचे तसेच लाईव्ह ॲनिमलसह, ड्रेस केलेले मांस विक्री करण्याचा मानस आहे. नागपूर पशुवैद्यकिय महाविद्यालयातील तज्ञ डॉ. वैशाली बांठीया व डॉ. सारिपुत लांडगे यांची प्रक्षेत्रावर भेट होते आणि शास्त्रीय सल्ला व लसीकरणाकरीता मार्गदर्शन व मदत मिळते. डॉ. एन. व्ही. कुरकुरे, संचालक संशोधन, मपमविवि व डॉ. हेमंत बिराडे, माजी सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यकीय व पशुविज्ञान संस्था, अकोला यांचे देखील वेळोवेळी सहकार्य मिळत राहते.

श्री. जोसेफ हे या व्यवसायाचे श्रेय स्वत:च्या मेहनतीला आणि कुटुंबाच्या सहकार्यास देतात. या व्यवसायाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन चांगला नाही. परंतू व्यवसायात उत्पन्न अधिक आहे. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी व सध्याचे परिस्थितीत सामाजिक स्वरूपावर अद्यापही हवा तितका फरक जाणवत नाही. बेरोजगार युवकांना ते या व्यवसायात अविरत मेहनत आणि प्रक्षेत्रावर स्वत: उपस्थित राहिल्यास जेवढे श्रम तेवढा व्यवसाय वाढतो व तेवढी उत्पन्नात वाढ होते असे सांगतात. हा व्यवसाय बेरोजगार होतकरू युवकांनी अवश्य सुरू करावा व आपली बेरोजगारी समाप्त करुन इतरांना देखील रोजगार द्यावा अशाप्रकारे प्रोत्साहीत करतात.

मार्गदर्शक
डॉ. वैशाली बांठीया व डॉ. सारिपुत लांडगे
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

श्री. अमितकुमार एलफीक जोसेफ
ग्रेस लाईव्हस्टॉक फार्म,नागपूर
मो. ८४४७६२६१४४





माफसू यशोगाथा



किरकोळ मासे विक्रेता ते यशस्वी मत्स्यसंवर्धक

श्री. दिवाकर मंडल हे देवीपूर, ता. आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथील शेतकरी असून ते रिकाम्या वेळेत मासे विक्री व्यवसाय करत असत. बिनभरवशाची शेती आणि मासे विक्रीतून मिळणारा अत्यल्प लाभ यामुळे श्री. दिवाकर मंडल सतत चिंतेत असत. याच काळात त्यांच्या गावातील एका प्रगत शेतकऱ्याने त्यांना मत्स्य संवर्धन या व्यवसायाबद्दल सुचविले. विदर्भातील मत्स्य व्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा शोध घेत असतांनाच श्री. मंडल यांना महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालयाबद्दल माहिती मिळाली आणि सन २०१६ मध्ये महाविद्यालयात आयोजित ''गोडया पाण्यातील मत्स्य सवंर्धन'' या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमात ते दाखल झाले. प्रशिक्षणादरम्यान श्री. मंडल यांना महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रशांत तेलवेकर आणि श्री. राजीव राठोड यांनी शेततळयातील मत्स्य संवर्धनासाठी प्रोत्साहीत केले व प्रगत मत्स्य संवर्धनाविषयीचे मार्गदर्शन दिले. मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे श्री. मंडल यांनी सन २०१७-१८ या वर्षात ३००० वर्ग मीटर आकाराचा तलाव खोदून रोहू व कटला या मास्यांचे संवर्धन देवीपूर येथील आपल्या शेततलावात सुरू केले.

मत्स्य संवर्धनाकरीता तलावाची शास्त्रोक्त पद्धतीने बांधणी, मत्स्यबीज संचयन, खत व खाद्य यांचे व्यवस्थापन तसेच मत्स्य संवर्धनासंबंधी आवश्यक इतर तांत्रिक बाबींबाबत डॉ. प्रशांत तेलवेकर आणि श्री. राजीव राठोड यांनी वेळोवळी श्री. मंडल यांना मार्गदर्शन केले. यातुनच श्री. दिवाकर मंडल यांना सन २०१९-२० या वर्षात रोहू व कटला या माशांच्या मत्स्य संवर्धनातून २४०० किग्रॅ. उत्पादन मिळाले व रू. २,८८,०००/- इतकी रक्कम मासे विक्रीतून मिळाली. सदर मत्स्य संवर्धनातून वर्ष अखेरीस खर्च वजा जाता श्री. मंडल यांना रू. १,५०,०००/- इतक्या रक्कमेचा निव्वळ नफा मिळाला. मत्स्य संवर्धनामधील फायद्यामुळे श्री. दिवाकर मंडल यांनी आता साधारण ४००० मीटर वर्ग या क्षेत्रफळाचे दोन नविन तलाव तयार केले आहेत व त्यामध्ये पंगस व तिलापीया या प्रजातींचे मत्स्य संवर्धन ते सध्या करीत आहेत. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील डॉ. प्रशांत तेलवेकर आणि त्यांचे इतर सहकारी श्री. दिवाकर मंडल यांना त्यांच्या व्यवसाय वृद्धीसाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतात.

मार्गदर्शक
डॉ. प्रशांत तेलवेकर व श्री. राजीव राठोड
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

श्री दिवाकर रविंद्र मंडल
देवीपूर, ता. आरमोरी, जि. गडचिरोली
मो. ९६०४०८८६०५







आदीवासी गटातील महिलांनी मत्स्य संवर्धनातुन साधली आर्थिक उन्नती

राजक्का, बेबी, मैनी, बुज्जी, नंदा, अनिता आणि गिल्लो या आहेत गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यामध्ये असलेल्या आलदांडी गावातील आदिवासी महिला, ज्या पूर्वी केवळ घरकाम व इतर संसारोपयोगी कामात व्यस्त असत. संसाराला हातभार लागावा म्हणून एखादा जोडधंदा करावा या उद्देशाने या महिलांनी महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (उमेद) यांच्या सहाय्याने जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गटाची सन २०१६-१७ मध्ये स्थापना केली. परंतू उपजिविकेकरीता कोणते कार्य हाती घ्यावे याबाबत या महिला संभ्रमात होत्या. गावालगत असलेली शेती आणि एक गावतलाव एवढीच संसाधने त्यांच्याकडे उपलब्ध होती. अशातच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर तर्फे राबविण्यात आलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र, गडचिरोली पुरस्कृत ''गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी जनतेचे शास्त्रोक्त मत्स्यव्यवसाय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शाश्वत उपजिवीका'' या प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (उमेद) यांच्या सल्ल्यानुसार आलदांडी या गावातील जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गटाची निवड मत्स्य संवर्धन विकास या उपक्रमाकरीता करण्यात आली. या स्वयंसहायता गटातील महिलांना मत्स्य संवर्धन करण्याकरीता प्रोत्साहीत करण्यात आले. गटातील महिलांनी एकत्र येवून ग्रामसभेकडुन ठेका पद्धतीने मत्स्य संवर्धन करण्याकरीता गावतलाव भाडेतत्वावर घेतला. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील डॉ. प्रशांत तेलवेकर आणि श्री. राजीव राठोड यांनी या स्वयंसहायता गटातील महिलांना शास्त्रोक्त मत्स्य संवर्धन कसे करावे याबाबत प्रशिक्षण दिले. तसेच महाविद्यालयातर्फे प्रकल्पाअंतर्गत मत्स्यबीज, कार्प व पंगस मत्स्य प्रजातींच्या बोटूकल्या, माशांच्या वाढीसाठी मत्स्य खाद्य आणि खनिज मिश्रणे पुरविण्यात आली. सदर स्वयंसहायता गटातील महिलांकरीता आलदांडी गावामध्ये मत्स्य संवर्धनावरील कार्यशाळा आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन वेळोवेळी करण्यात आले व महत्वाच्या बाबींवर मार्गदर्शनही करण्यात आले.

तलावाचे व्यवस्थापन, पाणी व मातीच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन आणि माशांचे खाद्य व्यवस्थापन या बाबींमध्ये गटातील महिलांनी वेळोवेळी लक्ष देवून माशांची वाढ कशी चांगल्या रितीने करता येईल व भरपूर उत्पादन कसे मिळवता येईल यासाठी विशेष प्रयत्न केले. मत्स्य संवर्धनातील एक वर्षाच्या कालावधीनंतर या गटाने २६१३ किग्रॅ. माशांची विक्री केली ज्यामधून रू. २,०९,०००/- इतके उत्पन्न गटास प्राप्त झाले. पहिल्याच प्रयत्नातील या यशानंतर गटातील काही सदस्य जसे श्रीमती राजक्का बंडु आत्राम यांनी आत्मविश्वासाने मत्स्य संवर्धनाचा व्यवसाय स्वतंत्रपणे करण्यास सुरवात केली आहे. त्याकरीता स्वत:च्या शेतात नविन तलावाची निर्मितीसुद्धा त्यांनी केलेली आहे. शेतीसोबतच मत्स्य संवर्धनाचा पर्याय उपजिविकेसाठी उपलब्ध झाल्याबद्दल जय पेरसापेन स्वयंसहायता गटातील महिला सदस्य आनंदी असून येत्या काळामध्ये मत्स्य उत्पादनामध्ये अधिक वाढ करण्याचे त्यांनी ठरवले आहे. मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील तज्ञ डॉ. प्रशांत तेलवेकर आणि सहकारी प्राध्यापक सदर स्वयंसहायता गटातील सदस्यांना आधुनिक मत्स्य संवर्धनाकरीता वेळोवळी मार्गदर्शन करीत असतात.

मार्गदर्शक
डॉ. प्रशांत तेलवेकर व श्री. राजीव राठोड
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

जय पेरसापेन महिला स्वयंसहायता गट
आलदांडी, अहेरी, जि. गडचिरोली
मो. ९४२१७६९११३





माफसू यशोगाथा



ओमकार यांची मत्स्य शेतीतुन समृध्दीकडे वाटचाल

श्री. ओमकार माणिकराव मसकल्ले हे आई वडील व पत्नीसह महादेववाडी ता.देवणी येथे शेती करतात. सोबतच पिठाची गिरणी पत्नी सांभाळते. शेती व गिरणी इत्यादी पासुन मिळणारे उत्पन्न पुरेसे नसल्यामुळे त्यांना मत्स्य शेती करण्याचा विचार आला.

त्यांच्याकडे ३० मी. X ३० मी X ४ मी आकाराचे शेततळे असून सन २०१५-१६ मध्ये त्यांनी मत्स्य शेतीचा व्यवसाय सुरू केला. सद्यस्थितीत संवर्धन चालू आहे. शेतातील मत्स्य संवर्धनाकरीता गुंतवणूक २५००० रूपये, विदयुत पंप रू. १६०००, लाईट बील ६००० रू. वर्षाकाठी लागत आहे. त्याच प्रमाणे शासनाच्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत.हा व्यवसाय करताना माश्यांच्या वाढीसाठी तांत्रीक माहिती नव्हती. ती माहिती मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील तज्ञाकडुन मिळाली. या व्यवसायात विक्रीसाठी अडचणी येत होत्या परंतु सोशल मिडीयाच्या माध्यमातून विक्री योग्य मासळीचे व्हीडीओ फोटो शेअर करत असल्यामुळे इतर ग्राहकांना ते माहिती होत गेली आणि त्यातुन पुढील व्यापाऱ्यांची ओळख इतर मत्स्य बांधवाकडून झाली. अशाप्रकारे अडचणीवर मात करून विक्री व्यवसाय स्वत: करत आहेत. यश प्राप्तीसाठी जिद्द, चिकाटी व प्रामाणीकपणे श्रम करण्याची तयारी असणे आवश्यक आहे असे ते म्हणतात.

प्रशिक्षणातून मत्स्यबीज सोडण्यासाठी तलावाची पुर्व तयारी कशी करावी,अधिक उत्पादन घेण्यासाठी जमिनीची मुळ उत्पादकता कमी आहे म्हणून तळ्यामध्ये काय उपाय करावे तसेच आम्लता निर्देशांक स्थिर राहण्यासाठी परिस्थितीनुसार उपाययोजना करण्याचे ज्ञान प्राप्त झाले. मासळीची पिल्ले सोडल्यानंतर त्यांची समाधानकारक वाढ होण्यासाठी खाद्याची माहिती तसेच मिश्रण व प्रमाण कसे द्यावयाचे या विषयीही प्रशिक्षणातून माहीती मिळाली. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढले तसेच योग्य नियोजनामुळे काम करणे सोईचे झाले.

हा मत्स्यशेतीचा व्यवसाय केल्यानंतर आर्थीक उत्पन्नात वाढ झाली. शेततळ्यांतील मत्स्य संवर्धनामध्ये एकुण नफा ८४,०००रू. होऊन खर्च वजा जाता, नफा ५५,००० रूपये झाला. या शेतीपुरक व्यवसायामुळे एकात्मीक शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत झाली या मध्ये शेतीसोबत मत्स्यशेती, सेंद्रीय व विषारीमुक्त फळ उत्पादन केले आणि एकुणच आर्थिक वृद्धीमुळे राहणीमान उंचावण्यात मदतीचे ठरले. हे सर्व जोडव्यवसाय यशस्वीरित्या केल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय आदर्श शेतकरी हे पुरस्कार प्राप्त झाले. विविध सामाजिक संस्थामध्ये त्यांच्या कार्याची वेळोवेळी दखल घेतली जाते.

शेती व जोडव्यवसाय यशस्वी होण्यासाठीचे श्रेय त्यांचे आई वडील त्याच प्रमाणे मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर, कृषी विभाग, लातूर व आत्मा, लातूर यांना देतात. बेरोजगारांसाठी मत्स्यशेती हा व्यवसाय स्वयंरोजगार म्हणून केल्यास आर्थिक उत्पन्न मिळवता येते. हा व्यवसाय यशस्वी करण्यासाठी मेहनत, जिद्द व सचोटीची आवश्यकता आहे. आपल्याकडील उपलब्ध संसाधनाचा वापर व तज्ञांचे योग्य मार्गदर्शन घेतल्यास नक्कीच मोठया प्रमाणात आर्थिक उत्पन्न घेवू शकतो असे ते म्हणतात. भविष्यामध्ये शेततळ्यांतील मत्स्य व्यवसायात आधुनिक पध्दतीचा अवलंब करून जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा मानस आहे.

मार्गदर्शक
डॉ. अजय कुलकर्णी
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री ओमकार माणिकराव मसकल्ले
महादेववाडी,ता. देवणी, जि. लातुर
मो. ९६५७०६३८९९







पदवीधर किरणकुमार यांनी नोकरीच्या मागे न धावता मत्स्य व्यवसायातुन साधली प्रगती

श्री. किरण कुमार जागेश्वर मेश्राम हे मु. पो. तालुका अर्जुनीमोर, जि. गोंदिया येथील रहिवासी आहेत. श्री. किरण कुमार हे पदवीधर असुन देखील नोकरीच्या मागे न धावता मत्स्य क्षेत्राची आवड असल्यामुळे त्यांनी मत्स्य व्यवसाय करण्याचे ठरविले होते व तशी त्यांची जिद्द होती. त्यासाठी त्यांनी मत्स्यशास्त्रासंबंधी माहिती घेवून शास्त्रशुध्द पध्दतीने मत्स्यव्यवसाय करायचे ठरविले होते. मत्स्य संवर्धन करण्यासाठी त्यांनी संबंधीत माहिती मिळण्याकरीता महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे संपर्क साधला तसेच मत्स्य संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयातुन प्रशिक्षण देखील पुर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी मत्स्य संवर्धनात अधिक उत्पादन देणाऱ्या माशांच्या प्रजातींचे संवर्धन कसे करावे, नेटींग, एरीयेशन, पाणी गुणवत्ता तपासणे, नर्सरी तलावाचे व्यवस्थापन, तलावातील खाद्य व्यवस्थापन, तलावातील अपायकारक माशांचा नायनाट इत्यादी बाबीविषयी तंत्रज्ञान आत्मसात केले. मत्स्य संवर्धनासाठी लागणारी महत्वाची माहिती प्रशिक्षणातून मिळवून तसेच मेहनतीला शास्त्रशुध्द ज्ञानाची सांगड घालत त्यांनी सुरूवातीला स्वत:कडे छोटेखानी उपलब्ध असलेल्या जमिनिचा व नंतर तलाव भाडेतत्वावर घेवून मत्स्य संवर्धनास सुरूवात केली.

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील सहाय्यक प्राध्यापक श्री.उमेश सुर्यवंशी यांनी श्री. किरण कुमार यांना मत्स्य संवर्धन करतांना येणाऱ्या अडचणींचे निरसण केले व शास्त्रशुध्द पध्दतीने मत्स्य व्यवसाय कसा करावा याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. मत्स्य पालना विषयी उचित अशी शास्त्रशुध्द माहिती प्राप्त झाल्यावर श्री. किरण कुमार यांनी मत्स्य संवर्धनातून जास्तीतजास्त उत्पादन कसे मिळविता येईल यासाठी विशेष प्रयत्न केले. मत्स्य संवर्धनात एक वर्षाच्या कालावधीनंतर त्यांनी १५ टन माशांची विक्री केली. त्यामधुन त्यांना संपुर्ण खर्च वजा जाता निव्वळ ५ ते ६ लाखांचा नफा झाला .

मत्स्य संवर्धन करतांना श्री. किरण कुमार यांना कोव्हीड २०१९ चा काळ असल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. तसेच लॉकडाऊन काळात मासे विक्रीसाठी बाजारपेठे उपलब्ध न झाल्याने स्वत: किरकोळ मासे विक्रीतून देखील नफा कमविला व मत्स्य संवर्धन सुरूच ठेवले. येणाऱ्या काळातही ते आधुनिक मत्स्य संवर्धन करणार असा निर्धार त्यांनी केला आहे. तसेच मत्स्य व्यवसायात ते आनंदी असून समाधानी आहेत.

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील तज्ञ श्री. उमेश सुर्यवंशी व इतर प्राध्यापक वर्ग श्री किरण कुमार यांना आधुनिक मत्स्य संवर्धनाकरीता वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करीत असतात.

मार्गदर्शक
श्री उमेश सुर्यवंशी व डॉ. प्रशांत तेलवेकर
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर

श्री किरणकुमार जागेश्वर मेश्राम
अर्जुनीमोर, जि. गोंदिया
मो. ८३९०११४८१८



माफसू यशोगाथा



दुध संकलन व्यवसायातुन दिलीप यांनी केली बेरोजगारीवर मात

श्री. दिलीप रामचंद्र गायकवाड, जन्म केडगांव, ता. दौड जि. पुणे येथील एका शेतकरी कुटुंबामध्ये झाला. त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी पुणे येथे एका महाविद्यालयात लिपीक या पदावर ३ वर्ष नोकरी केली. परंतु वेळेवर पगार मिळत नसल्यामुळे व मिळणाऱ्या पगारामध्ये कुटुंब चालवणे अशक्य होत असल्यामुळे त्यांनी नोकरी सोडुन शेती मध्ये लक्ष देण्यास सुरूवात केली व किराणा दुकान सुरू करून त्यामध्ये पशुखाद्य विक्री सुरू केली. त्यांच्या असे लक्षात आले की, आपल्या केडगांव तसेच शेजारील गावामध्ये बरेच शेतकरी दुध उत्पादक आहेत. त्यामुळे आपण दुग्ध संकलन सुरू केल्यास उत्तम प्रकारे चालु शकते या विचाराने हरी ओम दुग्ध संकलन केंद्र केडगांव या आपल्या गावी सुरू केले. सुरूवातीला दुग्ध संकलन करत असताना खुप अडचणी आल्या परंतु त्यांनी त्यावर मात करत संकलन सुरू ठेवले. त्याच दरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ जि. सातारा येथील दुग्ध प्रक्रिया विषयाच्या ५ दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये दुध संकलनाचे बारकावे, दुधाच्या विविध तपासण्या व दुधाचे विविध पदार्थ इत्यादींचे प्रात्यक्षिक घेतले. त्यामुळे आपल्या व्यवसायात होणाऱ्या चुका लक्षात आल्या आणि त्या चुका सुधारल्यामुळे नफ्यामध्ये वाढ झाली. प्रशिक्षण घेण्यापुर्वी त्यांचे दैंनंदिन दुधाचे संकलन ५०० लिटर होते ते २००० लिटर पर्यंत वाढले. सध्या केडगांव परिसरातील सुमारे १०० दुध उत्पादकांकडुन दुध संकलन करत असुन खाजगी डेअरीला त्याचा पुरवठा करतात. त्यांना त्यासाठी संबंधीत खाजगी डेअरीने २००० लिटर क्षमतेचा कुलर (चिलर) स्व:खर्चाने दिला आहे.

या कुलर (चिलर) मुळे दुध थंड राहत असल्यामुळे दुधाची प्रत चांगली टिकुन राहण्यास मदत होते. दुध संकलनासाठी स्वत: काम करतात. त्यांची पत्नी व आई देखील त्यांना मदत करतात तसेच त्यांनी मासिक पगारावर एका बेरोजगार युवकाला ही रोजगार उपलब्ध करून दिला आहे. प्रशिक्षणाचा फायदा कसा झाला हे सांगताना गायकवाड सांगतात की, दुधाचा दर फॅट आणि एसएनएफ यावर द्यायला सुरूवात केली. त्याचप्रमाणे दुधाचा रंग, वास, चव तपासणी करून उत्तम प्रतिचे दुध घ्यावयास सुरूवात केली. पुर्वी फक्त सकाळी करत असलेले दुध संकलनामध्ये बदल करून सकाळ आणि संध्याकाळ या दोन्हीवेळी दुध संकलन करण्यास सुरूवात केली. दुधाच्या भांड्याची स्वच्छता अत्यंत उत्तम प्रकारे करण्यास सुरूवात केली. तसेच दुध तपासणी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मशीनचा वापर केल्यामुळे कमी वेळात दुधाची अचुक तपासणी होवून दुध उत्पादकांना योग्य दर मिळु लागला. तसेच दुध संकलनासाठी लागणारे सॉफ्टवेअर खरेदी केल्यामुळे दुध उत्पादकांना दुध फॅट, एसएनएफ आणि झालेली एकुण रक्कम याचा एसएमएस त्यांच्या मोबाईलवर जावू लागला त्यामुळे ग्राहकांची विश्वासार्हता वाढली. डॉ. बी. आर. कदम व इतर सहकारी यांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे दुध संकलनाच्या व्यवसाया मध्ये आर्थिक नुकसान बंद झाले आणि व्यवसाय वृध्दींगत होत गेला.

सुरूवातीला स्वत: रू. १०००० गुंतवणुकीतुन व्यवसाय सुरू केला. आजपर्यंत कोणत्याही बँकेचे कर्ज त्यासाठी घेतलेले नाही त्याचप्रमाणे कोणत्याही शासकीय योजनेचा फायदा घेतला नाही. सध्या सर्व खर्च वजा जाता ५० ते ६० हजार रू. मासिक नफा मिळतो असे ते सांगतात. अशा या व्यवसायातील यशाचे रहस्य सांगताना व्यवसायातील प्रामाणिकपणा, सचोटी, दुध उत्पादकांना वेळोवळी मार्गदर्शन करणे त्यांची फसवणुक न करणे, त्यांच्या अडी अडचणीत त्यांना मदत करणे. भविष्यातील नियोजना विषयी विचारल्यानंतर श्री. गायकवाड सांगतात केशर या ब्रॅन्ड ने दुध आणि विविध दुग्धजन्य पदार्थ उत्पादन सुरू करावयाचे आहे.

मार्गदर्शक
डॉ. बापूराव कदम
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

श्री दिलीप रामचंद्र गायकवाड
केडगाव, ता. दौड, जि. पुणे
मो. ९७६७८९००४०





दुध संकलन केंद्र ते दुध डेअरी व्यवसायाची यशोगाथा

श्री. शिवकुमार पुरूषोत्तम साकोळे हे जवळगाव ता. उदगीर येथील रहीवाशी असून वडीलोपार्जीत आठ एकर शेती आहे. त्यामधून रु. ४ लक्ष पर्यत उत्पन्न मिळते. डी.फार्मसी पदविका शिक्षण करत असताना काही अडचणी आल्या मुळे ते पुढे शिकु शकले नाहीत. शिकुन पुढे नोकरी लागेल याची खात्री नसल्यामुळे त्यांनी शेती करण्याचा निर्णय घेतला. पारंपारिक पिके घेण्याऐवजी त्यांनी शेतीत भाजीपाला व इतर हंगामी पिके घेणे चालू केले. परंतु दिवंसेदिवस पाऊस कमी होत चालल्याने शेतीतील उत्पन्न मनाजोगते होत नव्हते. त्यामुळे त्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून दुध व्यवसाय करावयाचे ठरविले. प्रथम २०१७ या वर्षी दुध संकलन केंद्र गावात स्थापन केले. सुरूवातीस चाळीस ते पन्नास लिटर दुध जमा होऊ लागले. संकलीत दुध नळेगाव येथील खाजगी डेअरीस पाठविण्यात येत असे. सदर व्यवसाय उभारणीस कुठलीही शासकीय योजना अथवा बँकेचे कर्ज घेतले नाही. हळुहळु दुध संकलन वाढू लागले ते एका वर्षानंतर पाचशे लिटर पर्यंत पोहचले. त्यानंतर त्यांना मार्च २०१९ ला वर्तमानपत्रात दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर द्वारे तीन दिवसीय दुग्धजन्य पदार्थ निर्मीती प्रशिक्षण आयोजीत केल्याची माहिती प्राप्त झाली. त्या प्रशिक्षणात दुधापासून पनीर, दही, कलाकंद, छन्ना, खवा व खवा आधारीत मिठाई बनविण्याचे तंत्रज्ञान त्यांना अवगत झाले. निवळ दुध विक्री करणेपेक्षा मूल्यवर्धित दुग्ध पदार्थ तयार केल्यास अधिक नफा असल्याचे त्यांनी सांगितले. दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील प्राध्यापकांच्या तांत्रीक मार्गदर्शनाखाली लघु स्तरावर खवा व पनीर निर्मीतीचे युनीट सुरू केले. निव्वळ दुध विक्री पेक्षा मुल्यवर्धीत दुग्धजन्य पदार्थाच्या विक्रीमधून अधिक नफा मिळू लागला. आज बाजारात तीस ते चाळीस किलो खवा व चाळीस किलो पनीर जवळपासच्या गावात विकले जाते. तसेच दररोज ८०० ते १००० लिटर दुध विक्री करण्यात येते.

या व्यवसायात सुरुवातीला दुध नाशवंत झाल्याने पुष्कळ वेळा आर्थिक नुकसान होत होते. परंतु त्यांनी शीतकरण सयत्रांच्या सहाय्याने दुध अधिक काळ टिकविले, तसेच तांत्रिक मार्गदर्शन नसल्याने पुष्कळ वेळा आर्थिक नुकसान होत असे. परंतु प्रशिक्षण घेतल्याने व दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील प्राध्यापक वर्गाशी संपर्क साधून माहिती घेऊन अडचणीवर मात केली. सद्यस्थितीत व्यवसायात दररोज ७०० ते ८०० लिटर दुध संकलित होत असून अंदाजे मासिक उलाढाल रु ७,००,००० रू. ते ८,००,००० रू. एवढी आहे. तसेच सर्व खर्च वगळता रू. ७०,००० ते ८०,००० नफा मिळतो. दुध क्षेत्रात प्रगती केल्यामुळे समाजात मानाचे स्थान मिळत आहे. तसेच स्व-गावातील व जवळच्या गावातील कच्चे दुध खरेदी करत असल्यामुळे शेतकरी वर्ग खुष आहे व समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे. २०१७ मध्ये दुध संकलनाचा व्यवसाय सुरु करताना घरातील लोकांचा साकोळे यांचेवर विश्वास आणि घरातून त्यांना साथ मिळाली. या यशस्वी व्यवसायाचे श्रेय ते त्यांचे आई-वडीलांना देतात. तसेच दुध व्यवसायात येऊ इच्छुक युवकांनी सुरुवातीला छोटी गुंतवणूक करावी व व्यवसायातील सूत्र व बारकावे समजावून घ्यावे. त्यानंतर व्यवसायात प्रगती करण्याचा सल्ला देतात. भविष्यात त्यांना स्वत:चे डेअरी फार्म व दुध शाळा स्थापन करावयाचे आहे. दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील श्री संतोष चोपडे व डॉ. माधव पाटील यांचे मार्गदर्शन तर श्री निळकंठ पवार व डॉ. श्रीकांत कल्याणकर यांचे तांत्रिक सहकार्य लाभल्याने त्यांनी आभार मानले.

मार्गदर्शक
श्री संतोष चोपडे व डॉ. माधव पाटील
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री शिवकुमार पुरूषोत्तम साकोळे
जवळगाव, ता. उदगीर, जि. लातुर
मो. ९८२३७६०६४०







दुग्धजन्य पदार्थ निर्मितीतुन यशस्वी दुग्धव्यवसाय

नांदेड जिल्ह्यातील कंधार या दुष्काळी तालुक्यातील कुरूळा हे जवळजवळ १०,००० लोकसंख्येचं गाव असुन या गावातील लोक केवळ शेतीवर अवलंबवुन आहेत. याच गावचे रहिवासी असलेले श्री. संतोष व्यंकटराव पवळे यांचे शिक्षण जेमतेम १२ वी पर्यंतच झालेले आहेत. यातच आई-वडिलांचा व्यवसायही शेती असुन त्यांच्या कुटूंबात त्यांच्यासह त्यांची पत्नी, आई, वडिल व इतर तीन भाऊ असा परिवार आहे. त्यांचे दोन भाऊ सेवक व कारकुन म्हणुन काम करतात. श्री. संतोष पवळे यांचे शिक्षण कमी असल्यामुळे नोकरी मिळणे शक्य नव्हते. शेती असुनही जास्त उत्पन्न मिळत नव्हते यामुळे काहीतरी व्यवसाय करावा याचा ते नेहमी विचार करायचे. यातुनच २०१२ साली मित्रासोबत उदगीरला आल्यानंतर डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांची भेट झाल्याचे व दुग्धव्यवसायाकरिता मार्गदर्शन लाभल्याचे ते सांगतात. त्यांनी मार्गदर्शनानुसार २०१२ ला स्वत:च्या शेतात सुरूवातीला २ म्हशी विकत घेवुन व्यवसायास सुरूवात केली. नंतर मध्यंतरीच्या दुष्काळामुळे सुरू केलेला व्यवसाय जेमतेमच राहिला.

पुढे पाऊसमान चांगला सुरू झाल्यामुळे त्यांनी आय .डी. बी. आय. बँकेच्या अर्थसाहयाने ४ मुऱ्हा म्हशी खरेदी करून व्यवसाय वाढवला. त्यांनी या म्हशीच्या उत्तम संगोपनासाठी सन २०१८ मध्ये रू. ३,५०,०००/- इतका खर्च करून गोठा उभारणी केली. सुरूवातीला उत्पादन केलेले दुध ते खाजगी दुध संकलन केंद्राला द्यायचे. परंतु अपेक्षेप्रमाणे दुधाला भाव मिळत नव्हता म्हणुन त्यांनी दुग्धजन्य पदार्थ निर्मितीकडे लक्षे केंद्रीत केले. यातुनच त्यांनी घरच्याघरी खवा व पनीर तयार करून हॉटेलला व घरगुती वापरासाठी पुरवठा केला. यातुन त्यांना चांगले पैसे मिळु लागले.

दुग्धव्यवसाय करायचा तर चारा व्यवस्थापनाशिवाय पर्याय नाही हे ओळखून त्यांनी स्वत:च्या शेतामध्ये डी.एच.एन. ६, कडवळ, मका अशा चारा पिकांची लागवड जवळजवळ दीड एकर क्षेत्रावरती केली.यातून उच्च प्रतीचा चारा पुरवठा केल्यामुळे म्हशींचे दुध उत्पादन वाढण्यास मदत झाली. याचबरोबर दुधातील फॅट व एस. एन. एफ चे प्रमाण उत्तम राहण्यास मदत झाली. केवळ हिरव्या चाऱ्याने म्हशीचे योग्य पोषण होणार नाही हे ओळखून त्यांनी ज्वारीचा कडबा आणि सोयाबीनची गुळी जमा करून ठेवण्यास सुरूवात केली. पशुआहारात डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांच्या सल्ल्याने त्याचा योग्य प्रमाणात वापर सुरू केला. या प्रयत्नातुन त्यांना आता महिन्याकाठी रू. १५,००० ते २०,००० निव्वळ नफा सर्व खर्च वजा जाता मिळु लागला. या सर्व प्रयत्न व कष्टामुळे होतकरू तरूण म्हणुन गावात त्यांचे नाव घेतले जाते. तसेच समाजात त्यांची पतही वाढली. पुढे या व्यवसायामध्ये प्रगती करण्यासाठी त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालय,उदगीर येथे डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली दुग्धव्यवसायाचे प्रशिक्षण घेतले. या व्यवसायासोबतच शेळीपालन व्यवसाय सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. ते त्यांच्या यशाचे श्रेय कुटूंबातील सदस्य व मित्रांसोबतच डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांना देतात. अथक परिश्रम आणि योग्य प्रशिक्षणाशिवाय पर्याय नाही असा सल्ला ते बेरोजगार तरूणांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. प्रफुल्लकुमार पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

श्री संतोष व्यंकटराव पवळे
कुरूळा, ता. कंधार, जि. नांदेड
मो. ९५४५०२४१७६



माफसू **यशोगाथा**



दुग्धजन्य पदार्थ व्यवसाय ठरला फायदेशीर

आदील अफसर बेग मिर्झा, हे पदवीधर असुन काटोल येथे ४ वर्षापासुन आशियाना रेस्टॉरंट चालवतात. त्यांचे आई वडील शेतकरी असुन त्यांचे शेती व हॉटेल पासुन एकुण उत्पन्न वर्षाला सरासरी रू. ३,५०,००० एवढे आहे. हॉटेल व्यवसायामध्ये त्यांना दुग्धजन्य पदार्थाची रूचि आहे. त्यांनी मुल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थाचे प्रशिक्षण पशुजन्य पदार्थ तंत्रज्ञान विभाग, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे डॉ. आर. के. अंबाडकर, डॉ. किशोर राठोड व श्री. भालचंद्र ज. पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले आणि त्यामुळे त्यांचा दुग्धजन्य पदार्थ निर्मिती विषयीचा आत्मविश्वास वाढला. त्यांनी आशियाना रेस्टॉरंट, बस स्टॅन्डसमोर, काटोल, जि.नागपूर येथे दुग्धजन्य पदार्थ निर्मिती व विक्री हा व्यवसाय सुरु केला. ते सुरुवातीला स्वत:च्या गाई व म्हशीचे दुग्धोत्पादन व दुग्धजन्य पदार्थ तयार करुन बाजारपेठेमध्ये खुल्या स्वरुपात विकत होते. परंतु दुग्धजन्य पदार्थ पारंपारिक पध्दतीने तयार करत असल्यामुळे त्यांना वारंवार ग्राहकांकडून तक्रारी यायच्या आणि दुग्धजन्य पदार्थांना बाजारपेठेमध्ये वाव मिळत नव्हता. त्यांनी पशुजन्य पदार्थ तंत्रज्ञान विभाग, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून मुल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थ निर्मिती याविषयी प्रशिक्षण घेतले आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मिती विषयी वैज्ञानिक व विकसित पध्दती प्रशिक्षणामध्ये शिकून घेतल्या आणि त्या पध्दतींचा अवलंब त्यांनी त्यांच्या पारंपारिक दुग्धव्यवसायामध्ये केला. त्यामुळे ते आज समाजाला गुणवत्तापूर्ण तसेच ग्राहकांना परवडण्यायोग्य दुग्धजन्य पदार्थांची विक्री करत आहेत आणि दुग्धजन्य पदार्थ विषयीच्या ग्राहकांच्या तक्रारी बंद झाल्यात.

त्यांना दुग्धजन्य पदार्थ तयार करतांना बऱ्याचशा अडचणी येत होत्या. त्यावेळेस त्यांनी डॉ. किशोर शे. राठोड व डॉ. शेखर आर. बढे यांना दुरध्वनीव्दारे आणि व्हाटस्‌ॲप याव्दारे संपर्क केला असता दुग्धजन्य पदार्थ तयार करत असतांना येणाऱ्या बऱ्याचशा तांत्रिक अडचणींचे त्यांनी निरसन केले आणि आज ते १०० ते १५० लिटर दुधावर प्रक्रिया करुन दुग्धजन्य पदार्थ बाजारपेठे मध्ये विकत आहेत.

दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याचा व्यवसाय हा पारंपारिक असल्या कारणाने जास्त गुंतवणूक करण्याची आवश्यकता भासली नाही. फक्त दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे तांत्रिक घटक विकत घ्यावे लागले.

एफ.एस.एस.आय. चे नोंदणी प्रमाणपत्र घेऊन त्यांनी आपला दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचा व्यवसाय सुरु केला. आज त्यांचे पनीर रु. ३४० प्रति किलो या दराने साधारणत: ५ किलो तसेच रु. ८० प्रति किलो या दराने मलाई दही साधारणत: १० किलो, गाईचे खुले दुध रु. ५० प्रति लिटर आणि म्हशीचे खुले दुध रु. ६० प्रति लिटर प्रत्येकी ६० लिटर इतके दुध व दुग्धजन्य पदार्थाची बाजारपेठे मध्ये विक्री करत आहेत.त्यातुन त्यांना खर्च वजा जाता ३०,००० रूपये मासिक उत्पन्न मिळते.

त्यांना भविष्यामध्ये बस स्टॅन्डसमोर, काटोल जि. नागपूर या परिसरात असणारे दुधाचे संकलन करुन व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती करुन काटोल व नागपूर येथील बाजारपेठेमध्ये विक्री करावयाची आहे. दुग्धजन्य पदार्थ निर्मिती हा एक स्वतंत्र असा व्यवसाय सुरु झाला आणि पौष्टीक व गुणवत्तापूर्ण असे दुध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री ग्राहकांना परवडण्यायोग्य किंमतीत विकल्यामुळे समाजात चांगली प्रतिष्ठा मिळाली आहे. दुग्ध व्यवसायाचे श्रेय ते त्यांची पत्नी, कुटुंबीय, डॉ. आर. के. अंबाडकर, डॉ. किशोर राठोड व डॉ. शेखर बढे यांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. किशोर राठोड व डॉ. शेखर बढे
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

श्री आदील अफसर बेग मिर्झा
काटोल, जि. नागपूर
मो. ९८८११९३२६८





मुल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थाचे प्रशिक्षण ठरले फायदेशीर

श्री. अमोद अरुण जाधव,एम.बी.ए. झालेले उच्च शिक्षित तरूण असुन यांचा 'सागर टी ॲन्ड डेअरी फार्म' पुर्वी पासुनच सफाळे (ई.), जि. पालघर येथे आहे. श्री जाधव यांना शेती, पशुपालन तसेच दुग्धजन्य पदार्थ तयार करुन बाजारपेठेमध्ये विक्री करण्यात रुचि आहे. त्यांना मुल्य वर्धित दुग्धजन्य पदार्थाचे प्रशिक्षण मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय मुंबई येथे होत असल्याचे समजले आणि त्यांनी तीन दिवसाचे प्रशिक्षण डॉ. शेखर आर . बढे, डॉ. विवेक शुक्ला व डॉ. सतिश यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केले. त्यामुळे त्यांचा दुग्धजन्य पदार्थ निर्मिती विषयीचा आत्मविश्वास वाढला. तसेच दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याच्या विकसित पध्दतींचा अवलंब स्वत:च्या व्यवसायामध्ये ते करत आहेत. तसेच सुरुवातीला स्वत:च्या गाई व म्हशीचे दुग्धोत्पादन व दुग्धजन्य पदार्थ तयार करुन बाजारपेठेमध्ये खुल्या स्वरुपात विकत होते. परंतु दुग्धजन्य पदार्थ पारंपारिक पध्दतीने तयार करत असल्यामुळे त्यांना वारंवार ग्राहकांकडून तक्रारी यायच्या आणि दुग्धजन्य पदार्थांना बाजारपेठेमध्ये वाव मिळत नव्हता. त्यांनी दुग्धजन्य पदार्थ निर्मितीविषयी वैज्ञानिक व विकसित पध्दती प्रशिक्षणामध्ये शिकून घेतल्या आणि त्या पध्दतींचा अवलंब त्यांच्या पारंपारिक दुग्ध व्यवसायामध्ये केला. त्यामुळे ते आज समाजाला गुणवत्तापूर्ण तसेच ग्राहकांना परवडण्यायोग्य किंमतीत दुग्धजन्य पदार्थांची विक्री करत आहेत आणि दुग्धजन्य पदार्थ विषयीच्या ग्राहकांच्या तक्रारी बंद झाल्यात.

त्यांना दुग्धजन्य पदार्थ तयार करतांना बऱ्याचशा अडचणी येत होत्या.त्या तांत्रिक अडचणी डॉ. शेखर आर. बढे यांनी दुरध्वनीव्दारे आणि व्हाटस्‌ॲप याव्दारे सोडवल्या. आज प्रतिदिन १०० ते १५० लिटर दुधावर प्रक्रिया करुन दुग्धजन्य पदार्थ बाजारपेठेमध्ये विकत आहेत. दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याचा व्यवसाय हा पारंपारिक असल्याकारणाने जास्त गुंतवणूक करण्याची आवश्यकता भासली नाही. फक्त दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे तांत्रिक घटक विकत घ्यावे लागले. दुध व दुग्धजन्य पदार्थांचा व्यवसाय सफाळे (ई.), जि. पालघर येथील बाजार पेठे मध्ये करत आहेत. आज त्यांचे पनीर रु. ३६० प्रति किलो या दराने साधारणत: १० किलो तसेच रु. ८० प्रति किलो या दराने मलाई दही साधारणत: २० किलो, गाईचे खुले दुध रु. ६० प्रति लिटर आणि म्हशीचे खुले दुध रु. ७० प्रति लिटर प्रत्येकी ५० लिटर इतके दुध व दुग्धजन्य पदार्थांची बाजारपेठेमध्ये विक्री करत आहेत. त्यातुन दरमहा ३०,००० रू. उत्पन्न मिळते.

त्यांना भविष्यामध्ये सफाळे (ई.), जि. पालघर या परिसरात असणारे दुधाचे संकलन करुन व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती करुन मुंबई येथील बाजारपेठेमध्ये विक्री करायचे आहे आणि सफाळे (ई.) येथे सहकारी दुध संघ तयार करायचा आहे.

दुग्धजन्य पदार्थ निर्मिती हा एक स्वतंत्र असा व्यवसाय सुरु झाला आणि पौष्टीक व गुणवत्तापूर्ण असे दुध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री ग्राहकांना परवडण्यायोग्य किंमतीत केल्यामुळे समाजात चांगली प्रतिष्ठा मिळाली आहे. दुग्ध व्यवसायाचे श्रेय ते त्यांची पत्नी व कुटुंबीयांना आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. शेखर आर. बढे व सहकारी यांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. शेखर बढे व डॉ. विवेक शुक्ला
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय,मुंबई

श्री अमोद अरूण जाधव
सफाळे, (ई.), जि. पालघर
मो. ९८६७७१९९६४





उच्च शिक्षित ठाकुर पती-पत्नी बनले दुध व्यवसायिक

श्री. सुजित शिवदास ठाकुर व सौ. प्रतिक्षा सुजित ठाकुर, हे दोघे उच्चशिक्षित पती पत्नी. त्यांच्या कडे मध्यम ते हलकी ५ एकर शेती आहे. गेल्या चार वर्षापासुन श्री सुजित मत्स्य शेती करत आहेत.परंतु मत्स्य शेती या एकाच व्यवसायावर अवलंबुन न राहता त्यांनी पशुपालन करण्याचे ठरविले. सुरूवातीला ते खुले दुध बाजारपेठेमध्ये विक्री करत होते. त्यानंतर त्यांना डॉ. सुरेश जगदाळे यांच्या मार्फत 'मुल्यवर्धित दुध जन्य पदार्थ प्रशिक्षण' पशुजन्य पदार्थ तंत्रज्ञान विभाग,मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई येथे होत असल्याचे कळले. नंतर त्यांनी प्रशिक्षणाकरिता नोंदणी करून तीन दिवसाचे प्रशिक्षण डॉ. शेखर बढे , डॉ. विवेक शुक्ला आणि डॉ. सतिश यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केले. प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांनी एफ.एस.एस.आय. चे नोंदणी प्रमाणपत्र घेउन 'एव्हरफ्रेश डेअरी 'या नावाने धुतम, ता. उरण, जि. रायगड येथे व्यवसायाला सुरूवात केली.

जेव्हा ते दुग्धजन्य पदार्थ तयार करत होते त्यावेळी त्यांना बऱ्याचशा अडचणी येत होत्या. त्यावेळेस त्यांनी मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय येथील डॉ. शेखर बढे यांना दुरध्वनीव्दारे आणि व्हाटस्ॲप व्दारे संपर्क केला असता दुग्धजन्य पदार्थ तयार करत असतांना येणाऱ्या बऱ्याचशा तांत्रिक अडचणींचे निरसन केले आणि आज ते प्रति दिवसाला २०० ते ३०० लिटर दुधावर प्रक्रिया करुन दुग्धजन्य पदार्थ बाजारपेठेमध्ये विकत आहेत. दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे यंत्र व साहित्य तसेच दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे घटक पदार्थ जसे की, पनीर तयार करण्यासाठी लॅक्टीक ॲसिड आणि दही तयार करण्यासाठी लागणारे जैविक विरजन तसेच श्रीखंड, बासुंदी तयार करण्यासाठी लागणारे इतर घटक पदार्थ इत्यादींची आर्थिक गुंतवणूक ही साधारणत: रु. १,००,००० एवढी आहे (दुकानाची जागा आणि दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याची जागा सोडून). आज ते पनीर रु. ३६० प्रति किलो या दराने साधारणत: ८.०० किलो तसेच रु. १२० प्रति किलो या दराने मलाई दही साधारणत: ३० किलो, गाईचे खुले दुध रु. ६० प्रति लिटर आणि म्हशीचे खुले दुध रु. ७० प्रति लिटर प्रत्येकी ५० लिटर इतके दुध व दुग्धजन्य पदार्थांची बाजारपेठेमध्ये विक्री करत आहेत. त्यातुन दरमहा ५०,००० रू. उत्पन्न मिळते.

श्री सुजित ठाकुर व त्यांच्या पत्नी सौ. प्रतिक्षा ठाकुर यांचे असे म्हणने आहे कि कोविड १९ प्रादुर्भावामध्ये त्यांना दुध व्यवसायाने खुप साथ दिली. तसेच त्यांचे दही धुतम या गावी फार प्रसिध्द होत आहे. भविष्यात त्यांना या दुग्धव्यवसायाचा विस्तार करावयाचा आहे. मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई येथील तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी दुध व्यवसायाचे मुल्यवर्धीत पदार्थ निर्मीती याचे कौशल्य विकसित करून घेतले आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मिती हा एक स्वतंत्र असा व्यवसाय सुरु झाला. पौष्टीक व गुणवत्तापूर्ण असे दुध व दुग्धजन्य पदार्थ ग्राहकांना परवडण्यायोग्य किंमतीत विकल्यामुळे त्यांना समाजात चांगली प्रतिष्ठा मिळाली आहे. दुग्ध व्यवसायाचे श्रेय ते त्यांच्या कुटुंबीयांना तसेच तांत्रिक मदतीसाठी सहाय्यक प्राध्यापक डॉ. शेखर बढे व सहकारी यांना देतात.

मार्गदर्शक
डॉ. शेखर बढे व डॉ. विवेक शुक्ला
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय,मुंबई

सौ. प्रतिक्षा सुजित ठाकुर
श्री सुजित शिवदास ठाकुर
धुतम, ता. उरण, जि. रायगड
मो. ९८२०४१३४३१





महाराष्ट्रामध्ये किरकोळ चिकन विक्रीच्या दालनाची साखळी निर्माण करण्याचा मानस

श्री सदानंद गणपतराव ढगे, ४२ वर्षीय, नांदेड येथील कृषि पदवीधर यांचा पारंपारिक व्यवसाय शेती हा आहे आणि शेतीला जोडधंदा म्हणुन कुक्कुट पालन या व्यवसायाची निवड केली. सुरुवातीला ५०० पक्षी आणि नंतर २०१९ नोव्हेंबर महिन्यामध्ये मा. श्री. डॉ धनंजय मादळे (पशुवैद्यकीय अधिकारी, हिमायतनगर) यांच्या मार्गदर्शनाखाली ५००० पक्षांचे शेड उभारले. त्यापासूनचे सरासरी वार्षिक ५०,००० रू. उत्पन्न मिळत होते. परंतू २०१९ च्या शेवटी कोरोना आणी इतर अफवांमुळे कुक्कुट व्यवसायामध्ये नुकसान झाले. पारंपारिक व्यवसाय शेती असल्यामुळे नोकरी किंवा इतर व्यवसायासाठी प्रयत्न केले नाही कारण कृषी पदवीधर असल्यामुळे शेती करण्याची त्यांना आवड होती. कुक्कुट पालन व्यवसायामध्ये नियमित जिवंत पक्षांच्या दरामध्ये चढ उतार होत असतो त्यामुळे काही वेळेस आर्थिक नुकसान सहन करावे लागते. पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी यांच्या ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. आर.एन. वाघमारे यांच्या कडून स्वच्छ कुक्कुट मांस निर्मीती, व्यवसायाचे विविध परवाने तसेच मांस वितरण व विपनण यांची पुर्ण माहिती मिळाली. तांत्रिक माहितीसाठी कुक्कुट व बकरी मांस प्रात्यक्षिक केंद्राला भेट दिली आणि सर्व तांत्रीक बाबी डॉ. आर. एन. वाघमारे यांच्याकडून समजावून घेतल्या आणि मांस विक्री व्यवसाय ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे ऑक्टोंबर २०२० मध्ये सुरु केला. पिकेल ते विकेल या धोरणाअंतर्गत या व्यवसायाची रुपरेषा स्वत:च्या जागी करण्याचे त्यांनी ठरवले व दुकाना साठी लागणारी सर्व यंत्र सामुग्री डॉ. रुपेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली विकत घेऊन स्वच्छ व सुरक्षित मांस विक्री करण्याच्या व्यवसायाला सुरुवात केली. सदर कुक्कुट विक्री केंद्र सुरु करण्यासाठी ५ लाख रुपयाचे भांडवल वैयक्तीक व नातेवाईकांच्या मदतीने आणि बँकेचे वैयक्तीक कर्ज घेऊन सुरुवात केली व शासनाच्या कोणत्याही योजनेचा वेगळा असा फायदा घेतला नाही. सदर व्यवसायामध्ये ढगे यांच्या पत्नी आणि बंधु मदत करतात. त्यांच्या पत्नी कुक्कुट संगोपनाचे नियोजन व त्यांचे बंधु मांस विक्री व्यवसायामध्ये मदत करतात. सद्यस्थितीमध्ये चिकन विक्री व्यवसाय हा चांगल्या प्रकारे चालत असून कुक्कुट मांस किरकोळ विक्रीस दुकानासंबंधीची यंत्र सामग्री आणि इतर गोष्टी १५ X१२ फुट च्या दुकानामध्ये स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर दुकानाची नोंद हिमायतनगर, नगरपालिका आणि अन्न व सुरक्षा प्राधिकरण, भारत सरकार यांच्या कडे केली आहे. सदर दुकानामध्ये २ कामगार हलाल पध्दतीने कत्तल करण्यासाठी व विक्री करण्यासाठी कार्यरत आहेत. खर्च वगळता प्रति महिना २५,००० ते ३०,००० रूपये फायदा मिळत आहे.

यशाचे सुत्र म्हणजे कामासाठी लागणारी जिद्द व चिकाटी तसेच योग्य वेळेत पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांच्याकडून झालेले तांत्रिक मार्गदर्शन व मदतीमुळे कुक्कुट पालन व मांस विक्री व्यवसायामुळे श्री. ढगे यांना आर्थिक लाभ झाला आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी, हिमायतनगर तालुक्याचे तहसिलदार,पशुधन विकास अधिकारी व कृषी अधिकारी अशा प्रतिष्ठीत व्यक्तींनी दुकानास भेट दिली आहे. ते आपल्या यशाचे श्रेय वैयक्तिक मेहनतीस, कुटुंबियांना व मित्रमंडळीना तसेच परभणी येथील पशुवैद्यक महाविद्यालयातील शास्त्रज्ञांना देतात. श्री ढगे यांच्या कडून युवकांना संदेश आहे की दुसरीकडे नोकरी करण्यापेक्षा शास्त्रीय पध्दतीने शेती पुरक व्यवसाय केल्यास आर्थिक उन्नती होऊ शकते.

मार्गदर्शक
डॉ. रूपेश वाघमारे व डॉ. संजय लोंढे
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

श्री सदानंद गणपतराव ढगे
धारापुर, ता. हिमायत नगर, जि. नांदेड
मो. ९४०४९७५७९१

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-४४० ००१
दुरध्वनी : ०७१२- २५११७८४ संकेतस्थळ : www.mafsu.in
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर - ४४० ००१
दुरध्वनी : ०७१२-२९८००१४ ई-मेल : dee@mafsu.in

सहयोगी अधिष्ठाता मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय परळ, मुंबई- ४०० ०१२ ई-मेल : dmvc@mafsu.in संकेतस्थळ : https://mvc.ac.in	सहयोगी अधिष्ठाता नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय नागपूर- ४४० ००६ ई-मेल :adnvc@mafsu.in संकेतस्थळ :www.nvcnagpur.net.in
सहयोगी अधिष्ठाता पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय परभणी- ४३१ ४०२ ई-मेल :adcovaspbn@mafsu.in संकेतस्थळ :www.covaspbn.co.in	सहयोगी अधिष्ठाता पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर, जि. लातूर- ४१३ ५१७ ई-मेल : adcovasudg@mafsu.in संकेतस्थळ : www.vcudg.in
सहयोगी अधिष्ठाता क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा- ४१२ ८०१ ई-मेल :adknpcvs@mafsu.in संकेतस्थळ :www.knpvcs.in	सहयोगी अधिष्ठाता स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था अकोला-४४४ १०४ ई-मेल :adpgivas@mafsu.in संकेतस्थळ :www.pgivasakola.in
सहयोगी अधिष्ठाता दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय,वरुड, ता. पुसद, जि. यवतमाळ - ४४५ २०४ ई-मेल :adcdtwarud@mafsu.in संकेतस्थळ :www.cdtpusad.in	सहयोगी अधिष्ठाता दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय उदगीर, जि.लातूर- ४१३ ५१७ ई-मेल :adcdtudgir@mafsu.in संकेतस्थळ :www.cdtudgir.in
सहयोगी अधिष्ठाता मत्स्य विज्ञान महाविद्यालय नागपूर- ४०० ००६ ई-मेल :adcofsngp@mafsu.in संकेतस्थळ : www.cofsngp.org	सहयोगी अधिष्ठाता मत्स्य विज्ञान महाविद्यालय उदगीर, जि. लातूर- ४१३ ५१७ ई-मेल :adcofsudg@mafsu.in संकेतस्थळ : www.cofsu.in
संचालक वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र गोरेवाडा, जि. नागपूर- ४४१ ५०१ ई-मेल : directorwrtc@mafsu.in संकेतस्थळ : www.wrtc.in	वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, तडसर, ता. कडेगाव, जि. सांगली ई-मेल :kvksangli@mafsu.in
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर ई-मेल : kvknagpur@mafsu.in	वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, नागाव, ता. मुरबाड, जि. ठाणे ई-मेल : kvkthane@mafsu.in



महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर



मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई



नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर



पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी



पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर



क्रांतीसिंह नानापाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ



स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था , अकोला.



दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय,वरूड



दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर



मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर



मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर



वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र, गोरेवाडा, नागपूर

टोल फ्री क्र: १८००-२३३-३२६८



माफसू यशोगाथा

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर ४४० ००१

ईमेल : dee@mafsu.in संकेतस्थळ : www.mafsu.in

टोल फ्री क्र: १८००-२३३-३२६८